दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ८८ | शुक्रवार, दि. १६ मे २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये



**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com







## संमिश्र

### १८ लाख बोगस रेशन कार्ड रद्द

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्यात १८ लाख बोगस रेशन कार्ड रद्द करण्यात आले आहेत. सरकारी नोकरदार, व्यापारी, श्रीमंतांकडून स्वस्त धान्याचा गैरवापर करण्यात येत असल्याचे समोर आल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये काही बांगलादेशी नागरिकांनी काढलेले बोगस रेशनकार्ड रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

### थरूर यांनी लक्ष्मण रेखा ओलांडली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** बुधवारी दिल्लीत काँग्रेस कार्यकारिणी समितीची बैठक झाली. यामध्ये ऑपरेशन सिंदूरवरील शशी थरूर यांच्यासह काही पक्षनेत्यांचा समावेश आहे. त्यांच्या विधानांवर चर्चा झाली. केंद्र सरकार ऑपरेशन सिंदूरचे राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. एएनआयच्या वृत्तानुसार, बैठकीत असे म्हटले गेले की, ही वेळ वैयक्तिक विचार व्यक्त करण्याची नाही, तर पक्षाची अधिकृत भूमिका स्पष्ट करण्याची आहे. आम्ही एक लोकशाही पक्ष आहोत आणि लोक त्यांचे मत व्यक्त करत राहतात, पण यावेळी थरूर यांनी लक्ष्मण रेखा ओलांडली आहे.

### लग्नानंतर दुसऱ्याच दिवशी नवरीचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोलापूर :** डोक्यावर अक्षता पडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी नव्या नवरीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सोलापूरच्या माळशिरस तालुक्यात घडली आहे. या घटनेमुळे नवरीच्या माहेर व सासर या दोन्ही कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, पंचक्रोशीत हळहळ व्यक्त केली जात आहे.

### दहशतवाद्यांना शोधून केला एन्काऊंटर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरमधील त्रालमध्ये गुरुवारी सुरक्षा दलांनी तीन दहशतवाद्यांना ठार मारले. तिन्ही दहशतवादी एका घरात लपले होते. सुरक्षा दलांनी ड्रोनच्या मदतीने त्यांना शोधून काढले आणि त्यांचा एन्काऊंटर केला. ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये टॉप कमांडर आसिफ शेखचाही समावेश होता. याशिवाय सुरक्षा दलांनी आमिर नझीर वाणी आणि यावर अहमद भट यांनाही ठार मारले.




# कचऱ्याच्या दुर्गंधीत अडकला श्वास

## शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे : नागरिकांचे आरोग्य धोक्यात

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर : कचराच कचरा हे शब्द ऐकले की एक तक्रार, अस्वस्थता अन् नागरिकांच्या असहाय्यतेचा सूर स्पष्ट जाणवतो. शहरी भागांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेली ही समस्या केवळ सौंदर्यभंग करत नाही, तर नागरिकांच्या आरोग्यावर थेट परिणाम करत आहे. याकडे मात्र महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस कचऱ्याचे ढिगारे वाढत चालले आहे.**



या कचऱ्याच्या ढिगाऱ्यातील दुर्गंधीत नगरकरांचा श्वास अडकला आहे. कचऱ्याचे ढिगारे म्हणजेच सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा, हा नागरिकांच्या आरोग्यासाठी मोठा धोका निर्माण करतो. या समस्येची दखल घेणे आणि तत्काळ उपाय करणे अत्यावश्यक आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे संसर्गजन्य आजारांचा प्रसार होत असतो. साचलेल्या कचऱ्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया यासारख्या आजारांना कारणीभूत असणारे डास वाढतात. उघड्यावर सडलेला सेंद्रिय कचरा अन्न विषबाधा अन् गॅस्ट्रोएन्टेरायटिस सारखे आजार पसरवतो. प्रदूषण वाढत आहे. कचरा कुजताना तयार होणाऱ्या वायूंमुळे हवेचे प्रदूषण होते. पावसाळ्यात कचरा पाण्यात मिसळल्याने पाणी प्रदूषण व जलजन्य रोग होतात. मानसिक व सामाजिक परिणाम होत आहेत. घाण व दुर्गंधीमुळे नागरिकांना त्रास होतो, त्यामुळे मानसिक तणाव वाढतो. परिसरात राहण्याची इच्छा कमी होते व सामाजिक अस्वच्छता निर्माण होते.

### आयुक्तांसह अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

आयुक्तांसह महापालिकेतील इतर अधिकाऱ्यांचे शहरातील स्वच्छतेकडे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे शहरात ठिक-ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे साठलेले दिसून येत आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालय सोडून बाहेर फिरती घेतल्यास निश्चितच शहरात स्वच्छता राहण्यास मदत होणार आहे.

### कचरा संकलनाची वाहनेच येत नाही

कचरा संकलनासाठी रोज प्रभागांमध्ये कचरा संकलनाची वाहने येत नाही. त्यामुळे नाईलाजाने रस्त्याच्या कडेला कचरा नेवून टाकावा लागत आहे, असे नागरिकांमधून बोलले जात आहे. याकडे मनपा प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### 'या' उपाययोजना करा

ओला व सुका कचरा वेगळा करणे बंधनकारक करावे. नगरपालिका किंवा ग्रामपंचायतीने नियमित कचरा उचलणे गरजेचे आहे. शाळा, समाज संस्था आणि माध्यमांतून नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे गरजेचे आहे. दंडात्मक कारवाईबरोबरच प्रोत्साहनपर योजना सुरू कराव्यात. सोसायट्यांनी आणि घरगुती स्तरावर कंपोस्टिंग प्रोत्साहन द्यावे.

# पाण्यासाठी कुणीही आडवे येवू नका

## डॉ. सुजय विखे पाटील; गणेश परिसर पाझर तलावाचे जलपुजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** निळवंड्यांचे पाणी देणार हा विश्वास जनतेला दिला होता. आज निळवंडेचे पाणी आपल्याला मिळाल्याने हा विश्वास सार्थकी ठरला. आपण ठेवलेला विश्वास हाच खऱ्या अर्थाने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा विजय आहे. पाण्यासाठी कुणी आडवे येवू नये. गुन्हेगारी मुक्त शिर्डी मतदारसंघासाठी आजही आपली भूमिका आपण बदललेली नाही. गुन्हेगाराला पाठीशी घालणार नाही, उलट शिर्डी मतदारसंघ हा राज्यात आदर्श कसा राहिल यासाठी सदैव प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.



निर्मळ पिंपरी, अस्तगांव, केलवड, आडगांव बुद्रुक येथील पाझर तलाव तलावाचे जलपूजन प्रसंगी डॉ. सुजय विखे पाटील बोलत होते. यावेळी पाटबंधारे विभागाचे अभियंता लव्हाटे, यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी महिला उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील म्हणाले की, निळवंडेचे पाणी येईल की नाही, ही प्रत्येकाच्या मनात शंका होती परंतु आज ती शंका दूर झाली आहे. प्रत्येकाला पाणी मिळत आहे आणि यापुढेही ते मिळत राहणार आहे. आज मी बोललो की मोठी टीकाटिप्पणी होती. परंतु, शिर्डी आज भयमुक्त होत आहे. त्याचबरोबर मतदार संघामध्ये वेगवेगळ्या कामातून विकास हा सुरू आहे.

प्रत्येक आवर्तनातून आपण पाणी देण्यासाठी अभ्यास करत आहोत. प्रत्येकाच्या शेतापर्यंत पाणी देणे ही आपली जबाबदारी आहे. या पुढील काळात पाणी द्या, असे अर्ज तुम्ही करण्याऐवजी पाणी बंद करा, असे अर्ज आपल्याकडून येतील, असे सांगतानाच ज्यांनी पाणी दिले. त्यांनाच ऊस द्या, ऊस दुसऱ्याला देऊ नका, असे आवाहनही डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

विकासासाठी आपण सदैव कटिबद्ध आहे पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पान ४

# विजेचे अनेक प्रश्न प्रलंबित : आ. कर्डिले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर मतदारसंघातील अनेक लोक विजेचे प्रश्न घेऊन येत आहेत. त्यामुळे मागील पाच वर्षांतील अडीच वर्ष मतदारसंघाला ऊर्जा मंत्री पदाची संधी मिळाली. मात्र अडीच वर्षाच्या कार्यकाळामध्ये विजेचे प्रश्न सुटलेले नसावेत आणि म्हणूनच आजही मोठ्या संख्येने शेतकरी सिंगल फेज तसेच शेती लाईनचे प्रश्न प्रामुख्याने घेऊन येत आहेत. लवकरच प्राधान्याने मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या विजेचा प्रश्न सोडवला जाईल, असा विश्वास आ. शिवाजीराव कर्डिले यांनी व्यक्त केला आहे.



करंजी येथील वाड्या-वस्त्यांवर सिंगल फेज वीज देण्याची मागणी आ. कर्डिले यांच्याकडे केली असून दोन दिवसांत संबंधित विभागाचे अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी करणार आहेत. लवकरच या सिंगल फेजच्या कामासाठी आ. कर्डीले यांच्याकडून निधी उपलब्ध करून या वाडी-वस्ती परिसरातील सिंगल फेजचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे बाळासाहेब अकोलकर, सुनील साखरे, विजय अकोलकर, आबासाहेब अकोलकर यांनी सांगितले.

पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील कोल्हेवाडी येथील गोपाळ वस्ती करंजी गावठाण येथील नगर रोड हनुमानवाडी रोड खंडोबावाडी रोड कानोबाची वाडी फाटा राम मंदिर परिसर या महत्त्वाच्या ठिकाणी सिंगल फेज लाईन देण्यासाठी करंजी येथील प्रमुख गाव पुढाऱ्यांनी आ. कर्डिले यांची भेट घेऊन विजेचा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली करंजीसह पान ४

# स्थानांतरणमधील काहीजण त्याच जागेवर

## जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांमध्ये चर्चा : प्रशासनाची बघ्याची भूमिका



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहायक व वरिष्ठ सहायक यांचे स्थानानंतरण करण्याची प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने पूर्ण केली आहे. ही सर्व प्रक्रिया वादातून झालेली होती. ज्यामुळे वाद झाला होता, तो कर्मचारी अजूनही त्याच विभागात कार्यरत असल्याची चर्चा सध्या जिल्हा परिषदेच्या वर्तुळात सुरु आहे.

### स्थानांतरणची प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात

स्थानांतरणाची प्रक्रियेवर जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. एका युवा नेत्याला खूश करण्यासाठी ही प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. परंतु संबंधित नेत्याच्या डोळ्यात धूळफेक जिल्हा परिषद प्रशासनाने केलेली आहे. ज्या कर्मचाऱ्यांसाठी ही प्रक्रिया राबवली तो कर्मचारी त्याच विभागात त्याच टेबलवर कार्यरत आहे. इतर कर्मचाऱ्यांवर मात्र प्रशासनाने अन्याय केला असल्याची चर्चा सध्या जिल्हा परिषदेत सुरु आहे.

मोजक्यांना महत्त्वाचे टेबल काही कर्मचाऱ्यांवर प्रशासन मेहबान झालेले आहे. त्यांना मोक्याचे टेबल देण्यात आलेले आहे. ते टेबल बदलले ही जात नाही. टेबल बदलावे, वाटले तरी अधिकारी त्या कर्मचाऱ्यांना घाबरत असल्याची चर्चा सध्या शिक्षण विभागात सुरु आहे.

जि. प. सामान्य प्रशासन विभागाने एका विभागात झालेल्या वादानंतर स्थानानंतरणाची प्रक्रिया राबविली. ही प्रक्रिया राबविताना संबंधितांनी नियमांचा अवलंब करणे आवश्यक होते. पान ४

# घरकुल योजनेचा नागरिकांनी लाभ घ्या : आ. काळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** देशातील प्रत्येक व्यक्तीला पक्के घर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशातून सुरु करण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी नाव नोंदणी करण्याची अंतिम मुदत दि. १५ मे होती. परंतु, गरजू नागरीक या पंतप्रधान आवास योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहू नये यासाठी पंतप्रधान आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. ३१ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ही भारत सरकारची एक प्रमुख मोहीम असून या योजनेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या नागरिकांचे हक्काच्या पक्क्या घराचे स्वप्न सत्यात उतरावे. यासाठी सुरु करण्यात आली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी गरजू पात्र नागरीकांना स्वत:च्या स्मार्ट फोनवरून सहजपणे आपली नाव नोंदणी करणे शक्य होते. परंतु कित्येक अशिक्षित नागरीकांना स्मार्ट फोनचा वापर योग्य पद्धतीने करता येत नसल्यामुळे असंख्य गरजू आदिवासी व गोर गरीब नागरिकांना या योजनेचा फायदा घेता आला नाही.

तसेच ज्या वेबसाईटवर नाव नोंदणी करणे आवश्यक होते ती वेबसाईट देखील बंद राहत असल्यामुळे नागरिकांच्या अडचणी अधिकच वाढल्या जावून असंख्य गरजू नागरीक या योजनेपासून वंचित राहणार होते. त्याबाबत राज्य शासनाकडे या पंतप्रधान आवास योजनेच्या नाव नोंदणीसाठी मुदतवाढ देण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती.



केंद्र शासनाने पंतप्रधान आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी नाव नोंदणी करण्यासाठी दि. ३१ मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे. मिळालेल्या मुदतवाढीचा फायदा घेवून ज्या गरजू नागरिकांना या योजनेत अद्यापपर्यंत आपली नावे नोंदविता आली नाही. अशा नागरिकांनी मुदतीच्या आत आपली नाव नोंदणी करावी. ज्या नागरिकांना आपले नाव नोंदणी करण्यात अडचणी येत असेल अशा नागरीकांना ग्रामपंचायत प्रशासनाने योग्य सहकार्य करा.

**- आशुतोष काळे, आमदार**

# जलसंपदा विभागाची महामंडळे स्वायत्त करणार

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील; गोदावरी पाटबंधारे महामंडळाची बैठक उत्साहात

जनता आवाज वृत्तसेवा

**लोणी : राज्य सरकारवरील निधीचे अवलंबित्व कमी करण्यासाठी जलसंपदा विभागाच्या दोन्ही महामंडळांना स्वायत्त करण्यात येणार असून ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली असल्याची माहिती, अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**

गोदावरी पाटबंधारे विकास नियामक मंडळाची बैठक संभाजीनगरमध्ये जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन भवनात संपन्न झाली. बैठकीस अतिरिक्त मुख्य सचिव जलसंपदा दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक जयंत गवळी, अधीक्षक अभियंता गोदावरी महामंडळ राजेंद्र धोडपकर तसेच महामंडळा अंतर्गत सर्व क्षेत्रीय अधीक्षक अभियंता प्रत्यक्ष उपस्थित होते. तसेच दुरदृष्यप्रणालीद्वारे वित्त व नियोजन विभागाचे सचिव बैठकीस उपस्थित होते.




बैठकीत घेण्यात आलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची माहिती देताना मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, मराठवाड्यातील चारुतांडा साठवण तलाव प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील सुमारे ६८० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून जवळपासच्या गावांचा सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

'पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नदी जोड प्रकल्पांना चालना दिल्यामुळे आगामी काळात संपूर्ण राज्यात सिंचन क्षेत्रात वाढ होणार आहे. राज्यात व्यापक स्वरुपात कालवे दुरुस्तीची कामे प्रस्तावित आहेत. कालव्यांची वहनक्षमता पुनर्स्थापित करण्यात येणार आहे. वितरीकास्तरावर सिमेंटच्या पाईपद्वारे पाणी पोहोचविण्याचे नियोजन आहे.

**- राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री**

नदी जोड प्रकल्पांना चालना देणे, पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी दुष्काळी भागात आणून अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली आणणे, पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानाचा विकास करणे, मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात सुकळी आणि दिग्रस या प्रकल्पांना दोन वर्षात पूर्ण करुन मराठवाड्याचा सिंचन अनुशेष दुर करणे, असे विविध प्रकल्प राबविण्यात येतील. हे सर्व प्रकल्प राबविणे तसेच स्वातत्तेबाबत कार्यपद्धती ठरवणे, यासाठी 'मित्रा' या संस्थेस सल्लागार म्हणून नेमण्यात आले आहे. शिवाय आर्थिक सल्लागारही नेमण्यात आले आहेत, असे ना. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

### पाण्याचा पुनर्वापर आवश्यक : ना. विखे पा.

महानगरपालिका, नगरपालिका यांनी ८० टक्के पाण्याचा पुनर्वापर करणे आवश्यक आहे. परंतु अनेक महापालिका, नगरपालिका पुरेसे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प न उभारता ते पाणी तसेच नद्यांमध्ये सोडून देतात. त्यामुळे नद्या प्रदूषित होत आहेत. आपण शेतीचे पाणी कमी करुन पिण्यासाठी उपलब्ध करुन देतो. त्या पाण्याचा योग्य वापर होणे गरजेचे आहे.

### धरणांवर फ्लोटींग सोलर

जलसंपदा विभागाची महामंडळे शासनाच्या निधीवर अवलंबून असून महामंडळांना स्वायत्त केल्यास महामंडळाच्या उपलब्ध साधनांचा वापर करुन निधी वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. त्यासाठी महामंडळाचे असे स्वतंत्र पर्यटन विकास धोरण राबविण्यात येईल, धरणाचे लाभ क्षेत्र, बॅक वॉटर क्षेत्र येथे पर्यटन स्थळांचा विकास करुन पर्यटनाला चालना देण्यात येईल. सर्व धरणांवर फ्लोटिंग सोलर बसवून उर्जा निर्मिती तर होईलच शिवाय बाष्पीभवनामुळे होणारी जलपातळीतील घटही कमी करता येईल, असेही ना. विखे पाटील म्हणाले.

# बैलगाडा शर्यतींचा थरारला अखेर पावसाचा ब्रेक

## हजारो बैलगाडा प्रेमी नाराज होऊन परतले रिकाम्या हाताने घरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** सालाबादप्रमाणे या ही वर्षी निघोज येथे कपिलेश्वर यात्रा उत्सव निमित्ताने कालपासून सुरू झालेल्या दोन दिवसीय भव्य बैलगाडा शर्यतींच्या थरारला अचानक आलेल्या अवकाळी पावसाने ब्रेक लावल्याने हजारो बैलगाडा प्रेमींना नाराज होऊन रिकाम्या हाताने परतावे लागले.

सकाळी ८. ३० वाजता मान्यवरांच्या हस्ते नारळ फोडून बैल गाड्यांची भव्य स्पर्धा शासनाच्या परवानगीने व शासनाच्या नियमाप्रमाणे मोठ्या उत्साहात सुरूवात करण्यात आली. यावेळी नगर व पुणे जिल्हयातील बैल गाडा प्रेमी आपल्या सर्जा- राजासह मिळेल, त्या वाहनातून निघोज येथील कपिलेश्वर महादेवाच्या बैलगाडा घाटाच्या पायथ्याशी पुर्ण तयारी निशी हजर झाला. अन् बैलगाड्यांचा थरार ही तितक्याच वेगाने भिर्रर म्हणत वाद्यांच्या गजरात डी जे च्या तालावर सुरुवात झाली.

दुपारी १ वाजेपर्यंत टोकन नंबर १०५ च्या जवळपास गाडे सोडले. तोच वरूण राजाचे आगमन झाले. शेतकर्यांनी आपले बैल लोखंडी खुंट्या ठोकून कासऱ्याने जाम बांधून टाकले. या अवकाळी पावसाने सर्व परिसर जलमय झाल्याने अनेकांच्या गाड्या ही चिखलात रुतल्या होत्या. अखेर संयोजकांनी बैलगाडा शर्यत थांबवण्याचा निर्णय घेतला.

आज शुक्रवारी पाऊस झाला नाही तर उद्या शनिवार दि. १७ व रविवार दि. १८ रोजी पुन्हा दोन दिवस बैलगाड्यांचा थरार अनुभवायला मिळणार आहे, अशी माहिती श्री मळगंगा यात्रोत्सव कमिटीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे व ग्रामपंचायतीचे माजी सदस्य दिलीपराव ढवण यांनी दिली.



बैलगाडा शर्यतीत भाग घेणाऱ्या बैलगाडा मालकांनी मळगंगा यात्रोत्सव कमिटीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे , माजी चेअरमन बाळासाहेब लामखडे , मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रमेश ढवळे, जय बजरंग मंडळाचे पदाधिकारी पहिलवान अर्जुन लामखडे, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य दिलीपराव ढवण, निघोज सोसायटीचे संचालक दिलीप कवाद, संतोष ढवण, भास्कर रसाळ, गोरख बोदगे, विशाल लंके यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# तिरंगा मशाल रॅलीस नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

## विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केले चित्ररथ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** भारत मातेच्या वीर सैनिकांच्या शौर्याला वंदन करण्यासाठी व त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने कोपरगाव शहरात भव्य तिरंगा मशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले. समस्त देशभक्त कोपरगांवकरांच्या वतीने घेण्यात आलेल्या या उपक्रमात युवा प्रतिष्ठानचे संस्थापक युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी युवा सेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि आकर्षक चित्ररथ तयार केले होते.

या रॅलीचे प्रमुख आकर्षण ठरले ते ब्रह्मोस क्षेपणास्त्र आणि एस-४०० संरक्षण प्रणाली यांचे प्रतिकात्मक चित्ररथ. देशाच्या संरक्षण व्यवस्थेचे सामर्थ्य दाखवणारे हे चित्ररथ संजीवनीच्या युवा सेवकांनी अत्यंत कल्पकतेने साकारले होते. यामधून देशातील युवाशक्तीची राष्ट्रनिष्ठा आणि सैन्याबद्दलचा अभिमान प्रत्ययास आला.




या रॅलीदरम्यान पहेलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात हुतात्मा झालेल्या नागरिकांना तसेच देशाच्या सुरक्षेसाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी माजी आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी या चित्ररथाला साकारणाऱ्या युवकांना कल्पकता दाखवून केलेला या प्रयत्नाने सर्वांना प्रेरणा मिळाली आहे, असे मत व्यक्त केले.आयोजन करण्यामध्ये सहभागी असणाऱ्या सर्वांना धन्यवाद व्यक्त केले.

# सलग तिसऱ्या वर्षी यशाची हॅट्रिक

## संपदा फाउंडेशनची गुरुकुल संपदा शाळेचा दहावीचा शंभर टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** संपदा फाउंडेशनच्या गुरुकुल संपदा शाळेने सलग तिसऱ्या वर्षी दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल देत यशाची परंपरा कायम राखली आहे यावर्षी देखील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले असल्याची माहिती प्राचार्य सुधीर आहेर सरांनी दिली

परीक्षेत पलक संदीप रांका हीने ९० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला श्वेता अनिल राऊत हिने ८६.८०टक्के गुणाचा द्वितीय क्रमांक तर जैनब फिरोज शेख हिने ८५.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.





या यशानंतर संस्थेचे अध्यक्ष सुधीरआहेर पाटील .सारिका आहेर पाटील ॲड. संपतराव खर्डे पाटील, स्थानिक शाळा समिती, शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांचे पालकांचे अभिनंदन केले.

# सुपा एमआयडीसीत भूमिपुत्रांना रोजगार मिळालाच पाहिजे

## शिवबा संघटनेची उद्योगमंत्री सामंत यांच्याकडे तक्रार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यात सुपा औदयोगिक वसाहतीमध्ये अनेक बहुराष्ट्रीय व राष्ट्रीय कंपन्या आहेत. या प्रचंड रोजगार निर्माण करण्याची क्षमता असणाऱ्या कंपन्यांमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना हक्काचा रोजगार देण्याची मागणी शिवबा संघटनेने राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

सर्व कंपन्यांना सुपा औदयोगिक वसाहतीमध्ये पोषक वातावरण आहे. मात्र कंपन्या मनमानी करत असल्याचे निदर्शनास येत आहे. स्थानिक कर्मचाऱ्यांना भूमिपुत्र हुशार असूनही कामावर घेत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे भूमिपुत्रांवर अन्याय होत आहे. मात्र यामुळे एक प्रश्न पडतो की, कंपन्यांना वीज, पाणी, जागा या स्थानिकांची चालते. मग तालुक्यातील भूमिपुत्रांचे वावडे का?

पारनेर तालुक्यातील राजकीय पुढारी याकडे कोणीही लक्ष देत नाही व भूमिपुत्रांवर अन्याय हा वर्षानुवर्ष सुरू आहे.

या संदर्भात उद्योग मंत्री उदय सामंत, आ. काशिनाथ दाते यांच्याशी शिवबा संघटनेच्या वतीने पत्रव्यवहार करण्यात आला आहे व सुपा औदयोगिक वसाहत कार्यालय व सर्व कंपन्यांना शिवबा संघटना पत्रव्यवहार करणार आहे , त्यातूनही प्रश्न न सोडल्यास संघटना तालुक्यातील बेरोजगार युवकांना सोबत घेऊन आंदोलन करेल , त्याची जबाबदारी राज्य शासनावर राहिल , असा इशारा शिवबा संघटना अध्यक्ष अनिलराव शेटे यांनी दिला आहे



कर्नाटक सरकारने सर्वप्रथम भूमिपुत्रांना रोजगार देण्याबाबत तेथील कंपन्यांना आदेशच दिले आहेत. कंपनीत काम करत असलेल्या भूमिपुत्रांची यादी कंपनीच्या प्रवेशद्वारावर लावण्याची सक्ती केली आहे. त्याच धर्तीवर आपल्या पारनेर तालुक्यातील कामगारांना न्याय मिळालाच पाहिजे.

# देशाची सेवा हिच समाधानाची बाब

## सुभेदार बापू वंजारे; नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासे :** देशासाठी केलेली सेवा हीच माझ्यासाठी आत्मिक समाधानाची पूंजी असल्याचे भावनिक प्रतिपादन सुभेदार बापू वंजारे यांनी केले

येथील भूमीपुत्र आणि भारतीय सैन्य दलातील सुभेदार बापू वंजारे यांनी तब्बल २२ वर्षे देशसेवा केली. सेवानिवृत्तीनंतर त्यांची महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागात पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुलात क्रीडा अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाबद्दल नेवासा येथे नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

संयोजक मास्टर सुरेश लव्हाटे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, ''सुभेदार वंजारे यांनी शूटिंग या क्रीडा प्रकारात आंतरराष्ट्रीय स्तरावर ४ सुवर्ण, २ रौप्य व ३ कांस्य, तर राष्ट्रीय स्तरावर १५ सुवर्ण, १५ रौप्य आणि १० कांस्य पदके जिंकत गावासह देशाचा गौरव वाढवला आहे.''

हा सत्कार समारंभ औदुंबर चौकातील सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक सतीश मुळे होते. प्रमुख अतिथी म्हणून नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, ज्येष्ठ नेते रामभाऊ खंडाळे, करणसिंह घुले,मनोज पारखे, संजय सुखदान, मेजर दीपक देशमुख, डॉ. लक्ष्मणराव खंडाळे, बालेंद्र पोतदार, किशोर गारुळे, मनिषाताई लव्हाटे, पत्रकार गुरुप्रसाद देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.



या कार्यक्रमाला सुनीलराव बाघ, सतीश गायके, दत्ता शिंदे, देविदास साळुंके, शशिकांत नळकांडे, राजेंद्र मापारी, महेश मापारी, दिनेश कोरेकर, बाबासाहेब बंजारे, विकास व्यवहारे, गणेश चंजारे, भीमा बंजारे, सुजाता बंजारे, नवनाथ, विहान व वैशाली वंजारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिर्डीत सव्वातीन कोटी सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** शहरातील सराफ व्यापाऱ्यांना सोने देण्यासाठी आलेल्या गुजरातमधील व्यापाऱ्याचे सव्वातीन कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास करून त्याचाच मोटारचालक पसार झाला, मंगळवारची (दि. १३) रात्री ते बुधवारीच्या (दि. १४) मध्यरात्रीपर्यतच्या काळात ही घटना घडली.

याबाबत माहिती अशी: विजयसिह वस्नानी खिशी (वय ३५, रा. अहवाल घुमटी, ता. आमिर गह, जि. बनासकांटा, गुजरात) हे सराफ व्यापारी सोन्याचे दागिने येथील व्यापाऱ्यांना देण्यासाठी आपल्या अन्य सहकाऱ्यांसोबत मोटारीतून शिर्डीत आले होते. परिसरातील सराफ व्यापाऱ्यांना दागदागिन्यांचे वितरण करून, ते येथील आंध्रा गल्लीतील हॉटेल सुनीतामधील रूम नंबर २०१ मध्ये झोपले होते. दरम्यान, त्यांच्या वाहनाचा चालक सुरेशकुमार भूरसिंह राजपुरोहित (रा. चोटन बारमेर, राजस्थान) बंगत ठेवलेले साडेतीन किलो वजनाचे सोन्याचे वेगवेगळे दागिने व रोख चार लाख रुपये आणि काही चेक घेऊन पसार झाला. त्यात अंदाजे तीन कोटी २६ लाखांचा मुद्देमाल लंपास झाल्याचे विजयसिंह यांनी शिर्डी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

शिर्डीच उपविभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने, पोलिस निरीक्षक रणजीत गलांडे, सहायक निरीक्षक निवांत जाधव यांनी घटनास्थळी पाहणी केली. आरोपीच्या शोधासाठी शिर्डी पोलिसांचे पथक रवाना झाले असून, त्यांला लवकरात लवकर जेरबंद करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# श्रीमान गोकुळचंदजी विद्यालयाचा दहावीचा ८१.५६ टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव एज्युकेशन सोसायटीचे श्रीमान गोकुळचंदजी विद्यालयाचा दहावीचा निकाल ८१.५६ टक्के लागला असून या विद्यालयातील विद्यार्थी नेहमीच गुणवत्तेत अग्रेसर राहिले असून यावर्षी जारा आरीफ शेख हिला ९५.४० टक्के मार्क मिळून शाळेत प्रथम आली तर सार्थक मनोज संत याला ९५ टक्के गुण मिळवून दुसरा आला. तर गायत्री शिवाजी चंदाले हिला ९३ टक्के मार्क मिळून तिसरी तर सुजल गजेंद्र साबळे याला ८९.२ टक्के मार्क मिळून चौथा आला.

दहावीच्या परीक्षेमध्ये सर्व यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना कोपरगाव एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन, अध्यक्ष, सचिव, सहसचिव सर्व संचालक मंडळ तसेच शाळेचे मुख्याध्यापक रमेश गायकवाड उपमुख्याध्यापक रघुनाथ लकारे आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# तीन बिबट्यांच्या हल्ल्यात घोडा ठार

## पारनेर तालुक्यातील किन्ही-बहिरोबावाडी येथील घटना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळी ढोकेश्वर- :** तालुक्यातील किन्ही येथे बुधवारी पहाटेच्या सुमारास किनकर वस्ती परिसरात ढवळपुरी येथील मेंढपाळ अंकुश तांबे यांच्या घोड्यावर एकाचवेळी तिनं बिबट्यांनी हल्ला केल्याने घोडा जागीच ठार झाला आहे. बिबट्यांनी हल्ला केला त्यावेळी मेंढपाळ तांबे यांच्या पाळीव कुत्र्यांनी जोरजोराने भुंकण्यास सुरूवात केल्याने मेंढपाळ तांबे हे झोपेतून जागे झाले. त्यांना तीन बिबटे घोड्यावर हल्ला करताना दिसले. त्यावेळी त्यांनी जोरजोराने ओरडायला सुरुवात केल्याने बिबट्यांनी त्या ठिकाणाहून धूम ठोकली. परंतु घोडा मात्र जागीच गतप्राण झाला.

सदरची घटना मेंढपाळ तांबे यांनी किन्ही येथील युवक दत्ता घोडके यांना सांगितली असता, त्यांनी शेतकरी नेते अनिल देठे पाटील यांना घटनेची माहिती भ्रमणध्वनीवरून देत संबंधित मेंढपाळास मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी केली. तद्नंतर शेतकरी नेते अनिल देठे पाटील यांनी वनविभागाचे कर्मचारी निलेश बडे यांना घटनेची



माहिती दिली व तात्काळ घटनेचा पंचनामा करून संबंधित मेंढपाळास नुकसान भरपाई वनविभागाकडून मिळावी, अशी मागणी केली.

तद्नंतर वनविभागाकडून तात्काळ पंचनामा करण्यात आला असून लवकरच संबंधित मेंढपाळास नुकसान भरपाई म्हणून आर्थिक मदत देण्यात येणार आहे. यावेळी बंजारे, नवनाथ, विहान व वैशाली वंजारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# चांदेकसारे गावात दोन गटांत हाणामारी

## ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल; परस्पर विरोधी फिर्यादी दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे गावात सडक्या कैऱ्या आमच्या घराशेजारी का टाकल्या? अशा शुल्लक कारणावरून बुधवार दिनांक १४ मे रोजी दोन गटात हाणामाऱ्या होऊन या दोन्ही गटातील ८ जणांविरुद्ध कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनमध्ये कल्याण गोकुळ होन आणि द्वारकाबाई विनायक होन या दोन्हीही गटाच्या लोकांनी दिलेल्या फिर्यादीवरून ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की चांदेकसारे गावातील शेजारी राहणाऱ्या कल्याण गोकुळ होन यांनी तालुका पोलीस स्टेशनमध्ये येऊन प्रथम तक्रार नोंद केली. या तक्रारीत त्यांनी म्हटले आहे की, प्रमिला होन यांनी द्वारकाबाई विनायक होन यांना विचारणा केली की, सडलेल्या कैऱ्या आमच्या घराशेजारी का टाकल्या? असे विचारल्याचा राग आल्याने द्वारकाबाई विनायक होन, आदित्य विनायक होन, विनायक वामन होन, वैष्णवी विनायक होन यांनी फिर्यादीची पत्नी प्रमिला व मुलगी विद्या यांना शिविगाळ केली. तसेच फिर्यादी हे त्यांच्या घरासमोर उभे असतांना आदित्य विनायक होऊन याने फळीने डोक्यात मारून जखमी केले तसेच विनायक वामन होन यांनी फिर्यादीच्या छातीत बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. तर वैष्णवी विनायक होन व द्वारकाबाई विनायक होन यांनी फिर्यादीची मुलगी विद्या विकास गुरसळ हिला लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. यावरून द्वारकाबाई विनायक होन, आदित्य विनायक होन विनायक वामन होन वैष्णवी विनायक होन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

द्वारकाबाई विनायक होन यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, प्रमिला कल्याण होन यांनी शिवीगाळ केली तर कल्याण होन व प्रमिला होन यांनी फिर्यादीच्या अंगावर धावून गेले व कल्याण होन यांनी लाकडी काठीने फिर्यादीच्या डोक्यात व डाव्या कानावर मारून भिंतीवर ढकलून दिले. त्यामुळे फिर्यादी खाली पडले असता प्रमिला होन यांनी फिर्यादीस झटापट करून लाथा बुक्क्याने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या डोक्याला व कानाला जखम झाली व या झटापटीत फिर्यादीचा ब्लाउज फाटला व गळ्यातील मनी मंगळसूत्र गहाळ झाले. तसेच फिर्यादीचे पती विनायक होन यांना विकास चव्हाण (रा. विंचूर) तसेच रमेश चव्हाण (रा. चांदेकसारे) यांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली.



या मजकुरावरून कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला असून सदर घटनेचा पुढील तपास कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल एस.ए कुडके हे करत आहेत.

# आशा सेविकांचा तहसील कार्यालयावर मोर्चा !

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव मध्ये आज गुरुवार दि १५ रोजी अशा कर्मचारी व गटप्रवर्तक कर्मचारी यांचा आपल्या विविध मागण्यांसाठी शेवगाव तहसील कार्यालयावर भव्य असा मोर्चा काढण्यात आला होता.

अशा कर्मचारी व गटप्रवर्तक कर्मचारी यांना राज्यातील विधानसभेच्या निवडणुकांनंतर कोणत्याही प्रकारचे मानधन अद्याप पर्यंत शासनाकडून दिले गेले नाही. तसेच आपल्या वरिष्ठांकडून काम करताना अन्याय होत असल्याची तक्रारी त्यांनी यावेळी केली. यावेळी महिला कर्मचाऱ्यांनी सरकारच्या विरोधात मोठी घोषणाबाजी केली. हा मोर्चा कॉम्रेड संजय नांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आला होता. यावेळी मोठ्या प्रमाणावर गट प्रवर्तक व आशा कर्मचारी या मोर्चात सहभागी झाल्या होत्या.

यावेळी अंजली भुजबळ, सुवर्णा देशमुख, फरान पठाण, सविता चव्हाण, शितल थोरवे, अनिता इंगळे, मंगल कोल्हे, मिना बोरूडे, शोभा घुले, अस्मिता माळीसह महिला कर्मचारी हजर होत्या.

### दाखला हरवला आहे

कोपरगाव शहरातील अजित सुरेश कसाब यांचा प्रवासा दरम्यान शाळा सोडल्याचा दाखला हरवला असून सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**-२४४० सुकुंदा निवास**
गांधी पुतळ्याजवळ गांधीनगर
कोपरगाव ता. कोपरगाव जि.
अहिल्यानगर ४२३६०१
फोन - ९५२७०२०२७३

# संपादकीय

## योग्य वेळी निवृत्ती

शिखरावरून घेतलेली निवृत्ती जास्त लक्षात राहते. काही क्रिकेटपटूंनी असे धक्कातंत्र वापरले आहे. भारतातील कसोटी क्रिकेटमध्ये देशाला सर्वाधिक यश मिळवून देणाऱ्या विराट कोहलीची निवृत्ती अशीच चाहत्यांना चटका लावून जाणारी आहे. गेल्या काही वर्षांत विराटची कामगिरी त्याच्या लौकिकाला साजेशी होत नव्हती. त्याच्या बॅटमधून धावा कुटत नव्हत्या. त्याच्या काही चुका त्याला झेल द्यायला भाग पाडीत होत्या. २०१९ च्या अखेरीस त्याची कसोटी सरासरी ५५ च्या आसपास होती. ती आता ४७ च्या खाली आली आहे. २०२० पासून त्याने कसोटी क्रिकेटमध्ये फक्त तीन शतके केली आहेत. या काळात त्याची फलंदाजीची सरासरी ३५ पेक्षा कमी राहिली आहे. फॉर्ममधील या घसरणीमुळे त्याच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. यामुळे तो स्वतःवरच नाराज झाला होता. तो त्याच्या फलंदाजीतील एका कमकुवतपणाशी झुंजत होता. 'ऑफ-स्टंप'च्या बाहेर चेंडू मारण्यात त्याची असमर्थता दिसत होती. ऑस्ट्रेलिया दौऱ्यादरम्यान, जेव्हा तो सतत विकेटच्या मागे झेल देत होता, तेव्हा ही समस्या अधिक स्पष्ट झाली. प्रत्येक वेळी चेंडू त्याच्या बॅटच्या कडेला लागून यष्टीरक्षकाच्या हातात पडत असे. या कमकुवतपणाने त्याला खूप त्रास दिला, तरीही त्याची कामगिरी दुर्लक्ष करण्यासारखी नाही. विराटने २० जून २०११ रोजी किंग्स्टन येथे वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी पदार्पण केले. तिथे त्याने पहिल्या डावात ४ आणि दुसऱ्या डावात १५ धावा केल्या. यानंतर, त्याने कधीही मागे वळून पाहिले नाही आणि त्याच्या १४ वर्षांच्या कसोटी कारकिर्दीत त्याने १२३ कसोटी सामन्यांमध्ये ३० शतके आणि ३१ अर्धशतकांसह ९,२३० धावा केल्या. विराटच्या निवृत्तीमुळे कसोटीत दहा हजार धावा पूर्ण करण्याचे त्याचे स्वप्नही भंगले. 'बीसीसीआय'ने विराटला त्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यास सांगितले होते, असे वृत्त होते. तथापि, रोहित शर्माने निवृत्तीची घोषणा केल्यानंतर काही दिवसांतच, भारतीय संघ जूनमध्ये इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणार असल्याने विराटनेही तेच केले. अशा परिस्थितीत रोहित आणि विराटची निवृत्ती संघासाठी मोठा धक्का ठरू शकते. विराटच्या नेतृत्वाखाली भारताने सर्वाधिक काळ कसोटीत अव्वल क्रमांकाचा संघ राहण्याचा विक्रम केला. या संघाने परदेशी भूमीवर अनेक विक्रम ही रचले. त्याच्या नेतृत्वाखाली 'टीम इंडिया'ने ६८ पैकी ४० सामने जिंकले आणि १७ सामने गमावले. या काळात संघाने ११ सामने अनिर्णितही ठेवले. विराटचा विजयाचा टक्का ५८.८२ आहे. तो सौरव गांगुली, एमएस धोनी आणि मोहम्मद अझरुद्दीन सारख्या माजी कर्णधारांपेक्षा जास्त आहे. कोहलीनंतर, सर्वाधिक विजयांच्या बाबतीत धोनी दुसऱ्या क्रमांकावर आहे. रोहितने २४ कसोटी सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व केले आणि त्यापैकी १२ सामन्यांमध्ये संघाने विजय मिळवला. भारतीय संघाला नऊ सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. तीन कसोटी अनिर्णित राहिल्या. सचिन तेंडुलकरनंतर विराटने कसोटी क्रिकेटमध्ये क्रमांक-४ चे स्थान खूप चांगल्या प्रकारे सांभाळले. आता प्रश्न असा आहे, की त्याची जागा कोण घेणार? २० जून २०२५ पासून भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच कसोटी सामन्यांची मालिका सुरू होणार आहे. त्यात ही भूमिका कोण बजावते हे पाहावे लागेल. सचिन आणि विराट हे दोन महान फलंदाज गेल्या तीन दशकांहून अधिक काळ कसोटीत चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करत होते. यावरून, या क्रमांकावर फलंदाजीचे महत्त्व समजू शकते. 'आयपीएल' संपल्यानंतर इंग्लंडचा दौरा आहे. इंग्लंड दौऱ्यावर विराटच्या जागी चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करू शकणारे फलंदाज कोण असू शकतील, याचा अंदाज लावता येतो. केएल राहुल हा सध्याच्या काळातील असाच एक खेळाडू आहे, ज्याने संघाच्या गरजेनुसार भारतासाठी अनेक सामन्यांमध्ये वेगवेगळ्या स्थानांवर फलंदाजी केली आहे. त्याने ओपनिंगही केले आहे. त्याने पाचव्या आणि सहाव्या क्रमांकावरही फलंदाजी केली आहे. गेल्या वर्षी जेव्हा इंग्लंड संघ भारत दौऱ्यावर आला होता, तेव्हा त्याने विराटच्या अनुपस्थितीत पहिल्या सामन्यात चौथ्या क्रमांकावर फलंदाजी केली होती. या बाबतीत, तो इंग्लंडमध्ये चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी एक उत्तम पर्याय ठरू शकतो. त्याचा अनुभव त्याला या भूमिकेसाठी एक मजबूत दावेदार बनवतो. रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर शुभमन गिलला टीम इंडियाच्या कसोटी कर्णधारपदासाठी सर्वात प्रबळ दावेदारांपैकी एक मानले जात आहे. ३२ कसोटी सामने खेळलेल्या गिलने तिसऱ्या क्रमांकावर सलामी दिली आहे किंवा फलंदाजी केली आहे. त्याला भारतीय क्रिकेटमध्ये विराटचा उत्तराधिकारी म्हणून पाहिले जाते. अशा परिस्थितीत विराटच्या निवृत्तीनंतर तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी एक पर्याय असू शकतो.

करुण नायरने रणजी ट्रॉफीमध्ये ज्या पद्धतीने कामगिरी केली आहे, त्यावरून तो कसोटी संघात पुनरागमनाचा प्रबळ दावेदार आहे. २०१६ मध्ये इंग्लंडविरुद्ध त्रिशतक झळकावून तो प्रसिद्धीच्या झोतात आला. जर तो कसोटी क्रिकेटमध्ये परतला, तर तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी एक उत्तम पर्याय आहे. सरफराज खान देशांतर्गत क्रिकेटमध्ये एकही सामना खेळला नाही. गेल्या वर्षीच त्याने इंग्लंडविरुद्ध कसोटी पदार्पण केले. नंतर त्याने न्यूझीलंडविरूद्ध शानदार शतक झळकावून सर्वांना प्रभावित केले. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर त्याला संधी मिळाली नसली, तरी तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी एक चांगला पर्याय असू शकतो. त्याच्या उपस्थितीमुळे मधल्या फळीला बळकटी मिळू शकते. साई सुदर्शनची चालू आयपीएल हंगामातील सातत्यपूर्ण कामगिरी चांगली आहे. 'आयपीएल'मधील कामगिरीच्या आधारे कसोटी संघात निवड करण्याबद्दल बोलणे हास्यास्पद आहे; परंतु सुदर्शनने देशांतर्गत क्रिकेटमध्येही आपली छाप सोडली आहे. २३ वर्षीय हा खेळाडू तांत्रिकदृष्ट्या खूप मजबूत आहे. त्यामुळे तो कसोटी क्रिकेटसाठीदेखील परिपूर्ण आहे. गेल्या वर्षी त्याने ऑस्ट्रेलिया अ विरुद्ध भारत अ संघाकडून खेळल्या गेलेल्या अनधिकृत कसोटीत चौथ्या क्रमांकावर फलंदाजी केली होती. त्यामुळे, विराट कोहलीच्या जागी तो चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याचा पर्याय असू शकतो. विराटची जागा भरून काढणे शक्य नाही. गेल्या काही दिवसांतील त्याची कसोटी क्रिकेटमधील कामगिरी तशी समाधानकारक नव्हती; परंतु कसोटी क्रिकेटचा तो सर्वांत यशस्वी कप्तान होता. आता त्याच्या निवृत्तीमुळे त्याच्या तुलनात्मक कामगिरीची चर्चा होणे अपरिहार्य आहे. विराटच्या निवृत्तीमुळे कसोटीत दहा हजार धावा पूर्ण करण्याचे त्याचे स्वप्नही भंगले. विराटचे सातत्य आणि फलंदाजीतील अनुभव आगामी विश्वचषकात भारतासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. २०२७ मध्ये भारताला विश्वविजेते बनवण्याचे त्याचे ध्येय आहे आणि तो यासाठी पूर्णपणे तयारी करत आहे.

# 'गझवा ए हद' ला उत्तर द्यावे

**दृष्टीक्षेप**

**कर्नल (नि.), अनिल आठल्ये, अभ्यासक**



भारत आपल्या संस्कृतीप्रमाणे युद्धनीती आखतो. आजही आपल्यातील तो भाव जिवंत आहे. मात्र आता उघडपणे धोरणात्मक बदल करणे गरजेचे असल्याचे ताज्या दहशतवादी हल्ल्याने दाखवून दिले आहे. थोडक्यात, आता आपण पाकिस्तानचे तुकडे करण्याच्या उद्दिष्टावर काम करणार आहोत असे स्पष्ट सांगण्याची वेळ आली आहे. देशाचे अस्तित्वच संकटात आल्याचे समजले तर पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करणे बंद करेल.

अलिकडेच पहलगाममध्ये पाकिस्तानी आणि काश्मीरी दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केली, तेव्हा २६/११ च्या मुंबई हल्ल्याची आठवण झाली. त्या वेळीही या हल्ल्यात आपला काहीच हात नाही, असा कांगावा पाकिस्तानने केला होता. तसेच काही काँग्रेस नेत्यांनीही हा हल्ला आरएसएसच्या लोकांनी केल्याचा आरोपही केला होता. सुदैवाने तुकाराम ओंबळे यांनी दाखवलेल्या शौर्यामुळे अजमल कसाब जिवंत पकडला गेला आणि पाकिस्तानशी हल्ल्याचा थेट संबध समोर आला. पहलगामच्या हल्ल्यानंतर आता येत्या काही दिवसांमध्ये अशी ठोस माहिती समोर येण्याची शक्यता आहे. परंतु, हल्ल्यामागे पाकिस्तानच होता याचा सज्जड पुरावा म्हणजे दहशतवाद्यांनी वापरलेल्या बंदुका. ही हत्यारे त्यांना पाकिस्तानमधून मिळाली होती, यात शंका नाही. त्यामुळे या हल्ल्याविरोधात पाकिस्तानवर कारवाई केली जावी अशीच सर्व जनतेची सर्वपक्षीय नेत्यांकडून इच्छा व्यक्त झाली.

पाकिस्तानसंदर्भात अगदी १९४७ पासून आपले धोरण चुकीचे राहिले आहे. भारताप्रमाणेच पाकिस्तानलाही आपल्या देशातील लोकांची काळजी आहे आणि आर्थिकदृष्ट्या पाकिस्तान समृद्ध व्हावा यासाठी तेथील सरकार आपल्या सरकारप्रमाणेच काम करेल, अशी भाबडी आशा आपण गेली ७५ वर्षे बाळगून आहोत. इतिहासाचा दाखला घेतला तर १९४७ मध्ये पाकिस्तानमध्ये आर्थिक सुबत्ता होती. तेथील जनतेचे राहणीमान बाकी भारतापेक्षा चांगले होते. तसेच पाकिस्तानी नागरिकांचे दरडोई उत्पन्न भारताच्या दुप्पट होते. पण या ७५ वर्षांनंतर पाकिस्तानी जनता सर्वसामान्य भारतीय नागरिकांपेक्षा गरीब झाली आहे तसेच त्यांचे दरडोई उत्पन्न भारतीयांच्या उत्पन्नाच्या निम्मेदेखील नाही, हे वास्तव आहे.

आज पाकिस्तान भिकेला लागण्याचे मुख्य कारण म्हणजे या देशाचे उद्दिष्ट्य युद्ध आणि काश्मीर काबीज करणे हेच आहे. जनतेच्या आर्थिक विकासाला त्यांनी कधीच प्राथमिकता मानले नाही. उत्तर भारताच्या इतिहासाकडे नजर टाकली तर दिल्लीचे सुलतान आणि नंतरचे मोघल साम्राज्य यांनीही हेच केल्याचे दिसते. त्याचाच कित्ता पाकिस्तान गिरवत आहे. खेरीज इस्लामी धार्मिक शिकवणीप्रमाणे भारताला 'गझवा ए हद' म्हणजे पादाक्रांत करुन त्याचे संपूर्ण इस्लामीकरण करणे हे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे, असेच मानले जाते. काश्मीर हे केवळ निमित्त आहे. परंतु, संपूर्ण हदुस्तान पादाक्रांत करणे हेच पाकिस्तानचे जन्मापासूनचे उद्दिष्ट्य राहिले आहे. मात्र दुर्दैवाने भारताच्या नेतृत्वाला आजपर्यंत या मूलभूत प्रश्नाची समज आलेली नाही. पंडित नेहरु, लालबहाद्दूर शास्त्री, अटलबिहारी वाजपेयी, इंदिरा गांधी आणि अगदी पंतप्रधान मोदी आदींनी कधी ना कधी पाकिस्तानशी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. पण या मूलभूत धार्मिक धारणेमुळे पाकिस्तान भारताशी कधीच शांतता ठेवणार नाही, हे भारतीयांना आजपावेतो समजलेले नाही.

जनरल मुशर्रफ कारगील युद्धावेळी पाकिस्तानचे हुकूम शहा होते. त्यांनी सत्तेतून पायउतार झाल्यानंतर एकदा म्हटले होते की, काश्मीर प्रश्न पाकिस्तानच्या मनाप्रमाणे सुटला तरी भारत-पाकिस्तानात शांतता नांदणे शक्य नाही. त्यामुळेच भारतीयांची एकूणच युद्ध आणि त्याचा उपयोग याबद्दलची मनोवृत्ती आणि धारणा अजूनही श्रीरामाच्या काळातील सत्ययुगात अडकलेल्या आहेत, असे म्हणावे लागेल. भारतीय इतिहासाकडे डोळसपणे पाहिले तर जाणवते की, परकीय आक्रमणांसमोर आपण कधीच टिकाव धरु शकलो नाही. अर्थातच याला आपापसातली भांडणे आणि राजकीय ऐक्याचा अभाव कारणीभूत आहे. परंतु, त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे अगदी महाभारत काळापासून भारतीय युद्धाकडे 'सीमित युद्ध' अशाच भावनेने पाहतात. दुसरीकडे, परकीय आक्रमक संपूर्ण युद्ध आणि शत्रूचा संपूर्ण विनाश या उद्दिष्टाने लढतात. या मूलभूत फरकामुळे वैयक्तिक शौर्य असूनही धर्मयुद्धाच्या कालबाह्य कल्पनांमुळे भारतीय अनेक लढाया हरत राहिले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सोळाव्या शतकात या ऐतिहासिक चुकीला तिलांजली देऊन हदवी साम्राज्य स्थापन केले. जवळपास ५०० वर्षांनंतर महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी आक्रमकांवर निर्भेळ विजय मिळवले. त्यांच्या काळाआधी रात्रीच्या वेळी हल्ला कवा झोपलेल्या शत्रूंवर वार करणे हे सर्व निषिद्ध मानले जात असे. राजपूतांचा सर्व भर वैयक्तिक शौर्यावर असे. यापुढचे पाऊल म्हणजे विजय मिळवण्याऐवजी हौतात्म्य पत्करण्याचीच फुशारकी मुरवली जाऊ लागली. आज पाकिस्तानशी सामना करताना पुन्हा एकदा शिवाजी महाराजांनी शिकवलेला धडा गिरवण्याची गरज आहे. आज भारतीयांनी मनाशी खुणगाठ बांधण्याची गरज आहे की, पाकिस्तानचे राष्टीय उद्दिष्ट भारतावर कब्जा करणे आणि संपूर्ण भारत इस्लाममय करणे हेच आहे. पाकिस्तानच्या मते शांतता ही तात्पुरती सोय असते. यामुळे भारताला पाकिस्तानी आव्हानाचा यशस्वी साम ना करायचा असेल तर पाकिस्तान पूर्णपणे नष्ट करणे हे राष्ट्रीय उद्दिष्ट ठेवण्याखेरीज पर्याय नाही. एकदा हे राष्ट्रीय उद्दिष्ट सर्वसंमत झाले की त्यानंतर देशाचे धोरण, रणनीती आणि डावपेच आपोआपच बदलतील.

नेहमीप्रमाणे पहलगामचा हल्ला झाल्यानंतर ही गुप्तहेर तंत्राची चूक होती, अशी आवई उठवली गेली. परंतु गुप्तहेर संस्थांना दोष देणारे लोक विसरतात की, गेल्या ३० वर्षांमध्ये काश्मीरमध्ये पर्यटकांवर कधीच हल्ले झालेले नाहीत. पहलगाममध्ये ज्या प्रकारे एका आडबाजूला अनेक पर्यटक गेले होते तसेच मी स्वत: दोन वर्षांपूर्वी पत्नीसह सोनमर्गजवळ अशाच एका ठिकाणी गेलो होतो. तेथेही जाण्यास घोड्यावरुन प्रवास करावा लागला होता आणि आमच्यासारखे असेच शंभरभर पर्यटक तेव्हा तेथे होते. पहलगामप्रमाणेच त्या ठिकाणीदेखील आमच्याबरोबर कोणीही पोलीस कवा सैनिक नव्हते. आम्ही फिरत होतो तेथून जवळची सैनिक चौकी पहलगामप्रमाणेच दहा किलोमीटर दूरवर होती. त्यामुळे पहलगामच्या पर्यटनस्थळावर पोलीस नसणे ही काही नवी गोष्ट नाही. फरक हा की, आजपर्यंत पाळली जाणारी लक्ष्मणरेषा यावेळी पाकिस्तानने आणि पाक दहशतवाद्यांनी पार केली आहे. अर्थातच या आगळिकीसाठी पाकिस्तानला धडा शिकवणारी कारवाई होणे गरजेचे आहे.

आता सधी जलसंधी निलंबित करुन भारताने पाकिस्तानच्या मर्मावर घाव घातला आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये हिमालयातले बर्फ वितळून सधू आणि इतर नद्यांमध्ये पाणी येते आणि त्यावरच पाकिस्तानची तहान भागते. सध्या भारताकडे चिनाब आणि झेलम नदीवर जलविद्युत प्रकल्प असून त्यात उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पाणी साठून आपण पाकिस्तानमध्ये जाणारा ओघ कमी करु शकतो. याउलट, पावसाळ्यात पूर आले असताना साठवलेले अधिक पाणी सोडून तेथील पूरस्थिती आणखी गंभीर करु शकतो. थोडक्यात, आता ताबडतोब या नद्यांचे पाणी वळवणे शक्य नसले तरी आपल्या मर्जीप्रमाणे पाकिस्तानवर आपण नियंत्रण ठेवू शकतो. याचा त्यांच्या शेतीवर तसेच तेथील उद्योगधंद्यांवर नक्कीच परिणाम होईल.

गेल्या महिनाभरापासून काश्मीरला जोडणारा रेल्वेमार्ग तयार आहे. एकदा तो सुरू झाला की काश्मीरी लोकांची खूप सोय होणार आहे कारण त्यांच्याकडे होणाऱ्या फळे तसेच इतर उत्पादनाचा वाहतूक खर्च निम्म्यावर येणार आहे. अर्थातच त्यामुळे काश्मीरमध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण होईल, यात शंका नाही. एकदा एखाद्या प्रदेशात आर्थिक सुबत्ता निर्माण झाली की तेथील लोक सहजसहजी हसाचाराला उद्युक्त होत नाहीत. पाकिस्तानला नेमकी हीच भीती सतावत आहे. म्हणूनच त्यांनी पहलगामची घटना घडवून आणली. गेल्या अनेक महिन्यांपासून गुप्तहेर संघटनांना याची कुणकुण आहे. त्यामुळेच तयार होऊनही श्रीनगरची रेल्वेसेवा सुरू करण्यात आलेली नाही. पाकिस्तानी अतिरेक्यांचा पूर्ण बिमोड केल्याखेरीज ही रेल्वेसेवा सुरू केली तर त्यावर दहशतवादी हल्ले होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पहलगाम हल्ल्याच्या निमित्ताने पाकिस्तानमधील दहशतवादाची पाळेमुळे नष्ट करण्याची संधी मिळाली आहे.

पाकिस्तानचा पंजाब प्रांत दहशतवादाची जननी आहे. पाणी तोडल्यामुळे सगळ्यात जास्त परिणाम पंजाबवर होणार आहे. आपल्या सैन्याने चालवलेल्या दहशतवादामुळे ही परिस्थिती झाली आहे, अशी जाणीव पाकिस्तानी पंजाबात होईल तेव्हा तेथील लोकच सैन्याविरुद्ध उठाव करतील. मात्र यासाठी भारताने उघडपणे धोरणात्मक बदल करणे गरजेचे आहे. थोडक्यात, आता आपण पाकिस्तानचे तुकडे करण्याच्या उद्दिष्टावर काम करणार आहोत असे उघडपणे सांगण्याची वेळ आज आली आहे. असे झाल्यास आपल्या देशाचे अस्तित्वच संकटात आल्याचे समजल्यावर पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करणे बंद करेल का, या प्रश्नाचे उत्तर मिळू शकेल.

# पोपटराव रसाळ 'विश्वकर्मा गुणवंत' पुरस्काराने सन्मानित

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : निघोजचे भूमीपुत्र व छत्रपती संभाजीनगर येथील स्टरलाईट टेक्नॉलॉजी कंपनीत कार्यरत असलेले वृक्षमित्र पोपटराव रसाळ यांना राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते व राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर व राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे कामगार कल्याण मंडळाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार परिवारासोबत सन्मानपूर्वक देण्यात आला.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे ३६ वे कामगार भूषण व विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मुंबई येथील कामगार क्रिडा भवनात झालेल्या कार्यक्रमात सन्मानपूर्वक देण्यात आला.

कामगार भूषण पुरस्काराचे स्वरूप रोख ५० हजार रुपये, सन्मानचिन्ह व मानपत्र तर विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्काराचे स्वरूप रोख २५ हजार रुपये, सन्मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

> माझ्या आयुष्यात मला अनेक पुरस्कार मिळाले. पण रोख पैशाच्या स्वरूपामध्ये मिळालेला हा पहिलाच राज्यस्तरीय पुरस्कार आहे. २५ हजार रुपयाचा धनादेश राज्य शासनाकडून मिळाला आहे. ते संपूर्ण पणे निघोज गावातील स्मशानभूमी समोर जे दोन वृक्ष बागेचे व ऑक्सिजन पार्कचे काम झालेले आहे. त्यासाठी खर्च करण्यात येणार आहे व ती सर्व रक्कम पर्यावरण संवर्धन कार्यासाठी देण्यात येणार आहे.
>
> **– पोपटराव रसाळ**



नोकरी करूनही विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रिडा, संघटन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध जिल्ह्यांतील ५१ व्यक्तींना विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार सन्मानपूर्वक देऊन गौरविण्यात आले. यामध्ये मुळचे निघोज येथील भूमिपुत्र व नोकरी निमित्ताने संभाजीनगर मधील स्टरलाईट टेक्नॉलॉजी या कंपनीत कार्यरत असलेले आणि राज्यात सर्वत्र पर्यावरण पुरक वृक्षबिज संकलन, वृक्षारोपण तयार करून ते वृक्ष लागवड ), वृक्ष संगोपन सारखा महत्वपूर्ण उपक्रम राबवून निसर्गाची होणारी ऱ्हास थांबविण्याचे काम करणारे पोपटराव रसाळ यांनी केल्याने त्यांच्या कार्याची दखल राज्य कामगार कल्याण मंडळाने घेऊन अत्यंत मानाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार देऊन सन्मानित केले. या कार्यक्रमासाठी आ. मनीषा कायंदे, आ. मनोज जामसुतकर, प्रधान सचिव आय ए. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच पी. तुम्मोड, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, कामगार कल्याण उपायुक्त मनोज पाटील आदी मान्यवर उपस्थितीत होते.

# निलम गोऱ्हेंनी घेतले शनिदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** श्री शनी शनिशिंगणापूर येथे दि. १५ रोजी सायंकाळी विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी भेट देऊन शनिमुर्तीस तैलाभिषेक केला व उदासी महाराज मंदिरात अभिषेक व पूजा करून शनी दर्शन घेतले.

याप्रसंगी जनसंपर्क कार्यालयात देवस्थानच्या वतीने चिटणीस आप्पासाहेब शेटे यांनी नीलम गोऱ्हे यांचा सत्कार केला. यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे, सचिन देसरडा उपस्थित होते.

सकाळी चौंडी येथे अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकाचे दर्शन घेऊन लाडक्या बहिणीचा मेळावा व पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली



त्यानंतर सायंकाळी शनिदर्शन घेऊन त्या संभाजीनगरकडे गेल्या.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## स्थानांतरणमधील काहीजण त्याच जागेवर

परंतु नियमांना तिलांजली देत कामकाज केलेले आहे. त्यांना पाच वर्षे पूर्ण झालेली नाहीत. त्यांचेबी स्थानांतरण केलेले आहे. एखाद्या कर्मचाऱ्याने एखाद्या विभागात जर वरिष्ठ किंवा कनिष्ठ सहायक पदावर काम केलेले असेल तर त्याला त्या विभागात पुन्हा १५ वर्षे संधी दिली जात नाही. तसा १५ मे २०१४ चा शासननिर्णय आहे. या शासननिर्णयात तसा स्पष्ट उल्लेख आहे. असे असतानाही प्रशासन विभागाने स्थानांतरणात याकडे कानाडोळा करून स्थानांतरणाची प्रक्रिया राबविलेली आहे. यावर कर्मचाऱ्यांमध्ये आरडाओरड झाल्यानंतर त्यात दुरुस्ती करण्यात आली. संबंधित कर्मचाऱ्यांना इतर विभागात नियुक्ती देण्यात आली. तसा आदेश काढण्यात आलेला आहे. परंतु, हा आदेश जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर लोड करण्यात आला नसल्याची चर्चा सध्या कर्मचाऱ्यांमध्ये आहे. स्थानांतरणाची प्रक्रिया होवून तीन महिन्यांचा कालावधी लोटला आहे. परंतु, ज्याच्यामुळे ही प्रक्रिया राबवली आहे. तो कर्मचारी आहे, त्याच विभागात कार्यरत आहे. त्यामुळे त्या कर्मचाऱ्याला जिल्हा परिषदेतील कोणत्या अधिकाऱ्याचा वरदहस्त आहे? याचा शोध प्रशासनाने घेवून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांमधून होत आहे. त्यामुळे ही प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात आहे.

## पाण्यासाठी कुणीही आडवे येवू नका

पाटील यांचे निळवंडे हे स्वप्न होते. आज त्याची पूर्तता झाली आहे. ते जिल्हा परिषदे ध्ये उपाध्यक्ष असतांना जिरायत भागांमध्ये पाझर तलावाची निर्मिती त्यांनी केली. आज ते पाझर तलाव उन्हाळ्यामध्ये भरले. हा आनंद आपल्यासाठी मोठा आहे. जनतेच्या हितासाठी वाईटपणा घ्यावा लागला, तरी तो वाईटपणा घेण्यासाठी आपण सज्ज आहोत आणि मतदारसंघ हा गुन्हेगार प्रवृत्तीचा आपण होऊ देणार नाही. या मतदारसंघामध्ये अनेकांनी विष कालवण्याचे काम केले. परंतु त्यांना जनतेने धडा शिकवला आहे. काम करणाऱ्याच्या मागे जनता ही कायम असते. हेच शिर्डी मतदारसंघामध्ये जनतेने दाखवून दिले आहे. गोरगरीब जनतेसाठी सदैव कार्यरत राहून जनतेसाठी आपल्यापुढे पैशाचे मोल काहीच नाही. आज जिरायत भागाची ओळख बागायत भाग म्हणून होत आहे. आता प्रत्येकाला पाणी मिळणार आहे उपलब्ध पाण्यावरती ऊस लागवड करून ऊस उपलब्ध करा विखे पाटील कारखान्याची गाळप क्षमताही वाढवली आहे. आपल्या ऊस बेणे देऊ, तुम्ही फक्त ऊस लागवड करा, त्याची जोपासना आणि ती तो तोडून नेण्याची जबाबदारी आपली राहील. संकटामध्ये तुम्ही उभे राहिलात मी तुमच्या पाठीशी कायम उभा राहील असेही डॉ. विखे पाटील म्हणाले.

## विजेचे अनेक प्रश्न प्रलंबीत : आ. कर्डिले

मिरी, तिसगाव, चिचोंडी या परिसरात देखील शेतकऱ्यांच्या वीज प्रश्न संदर्भात अनेक अडचणी असून पाथर्डी-नगर-राहुरी तालुक्यातील सिंगल फेज तसेच शेतकऱ्यांच्या शेती पंपाचा वीजपुरवठा पूर्ण दाबाने व नियमित करण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावला जाणार असल्याचे आ. कर्डिले म्हणाले. यावेळी माजी सभापती बाळासाहेब अकोलकर, ज्येष्ठ नेते सुनील साखरे, शिक्षक नेते विजय अकोलकर, युवानेते आबासाहेब अकोलकर, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ आरोळे, राहुल अकोलकर, प्रशांत अकोलकर, लहानु अकोलकर, हिरामण अकोलकर, संजय अकोलकर, गणेश अकोलकर, अनिल अकोलकर, आदिनाथ अकोलकर, प्रमोद अकोलकर, संतोष अकोलकर, महादेव अकोलकर, दादासाहेब अकोलकर, रोहित अकोलकर, बबन अकोलकर, बंडू अकोलकर यांच्यासह करंजी ग्रामस्थ मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# खा. विखे पाटील विद्यालयाचा ९१.१७ टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील गोगलगाव येथील खा. बाळासाहेब विखे पाटील विद्यालयाचा दहावीचा निकाल ९१.१७ टक्के लागला असल्याची माहिती मुख्याध्यापक के. एम. म्हस्के यांनी दिली.

दहावीच्या परीक्षेत एकुण ३४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ३१ विद्यार्थी पास झाले आहेत. ४ विद्यार्थ्यां विशेष प्राविण्य मिळवले आहे. ११ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले असून ११ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत व ५ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले असून घोडे रोहिणी शिवाजी ८२.४ टक्के गुण मिळवत प्रथम, सातकर वैष्णवी गोकुळ ७९ टक्के गुण मिळवत द्वितीय तर सातकर प्रथमेश संजय ७८ टक्के गुण मिळवत तृतीय आला आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांना शुभेच्छा

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष जलसपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील, भारत घोगरे, शिवानंद हिरेमठ, प्रदीप दिघे, लीलावती सरोदे, मुख्यध्यापक के. एम. म्हस्के आदींनी अभिनंदन केले.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डिंग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९. * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# डॉ. तनपुरे निवडणूक बिनविरोधासाठी हालचाली

## माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्या उपस्थितीत बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरीची कामधेनू डॉ. तनपुरे साखर कारखाना निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्या आवाहनाला तालुक्यातील अनेक प्रमुख नेत्यांनी प्रतिसाद देत आजच्या बैठकीत भूमिका मांडली. यासाठी सर्व पॅनलच्या प्रमुख मंडळींनी आपापल्या वरिष्ठांशी चर्चा करून कारखाना निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न करावेत, असा बुधवारी (दि. १४) निर्णय घेण्यात आला.



▸ राजूभाऊ शेटे यांनी कारखाना बिनविरोध करायचा ही भूमिका योग्य परंतु कोण लोक घ्यायचे, कारखाना कसा चालू करायचा, बँकेचं देणं कस द्यायचं, शेतकऱ्यांचं व कामगारांचं देणं द्यायचं कसे याचा विचार करणे महत्वाच आहे असे म्हंटले. सत्यजित कदम यांनी सर्वांनी एकत्रित मनाचा मोठेपणा दाखवून कारखाना बिनविरोध करण्यासाठी पुढे येणे आवश्यक असल्याचे म्हंटले आहे.

माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम, रावसाहेब चाचा तनपुरे, राजुभाऊ शेटे, तान्हाजी धसाळ, रवी मोरे, उत्तम म्हसे, बाळासाहेब खुळे, सुरेश बानकर, शामराव निमसे, धनंजय गाडे, विक्रम तांबे, देवेंद्र लांबे, अमोल भनगडे, रवी म्हसे, विजय डौले, अण्णा बाचकर, दत्ता कवाणे, सुधीर तनपुरे, सतीश बोरुडे, प्रकाश संसारे, शहाजी कदम, अमोल कदम, संतोष चव्हाण, गणेश मुसमाडे, गोरख घाडगे, नारायण घाडगे, राहुल तमनर, कारभारी खुळे उपस्थित होते.

रावसाहेब चाचा तनपुरे म्हणाले, राहुरी कारखाना हा बिनविरोध झाला पाहिजे ही माझी पहिल्यापासून इच्छा आहे. कारखाना बंद असल्याने राहुरी कारखाना, देवळाली प्रवरासह आसपासच्या गावांतील बाजारपेठा उध्वस्त झाल्या आहे. नगर जिल्ह्यातील कोणत्याच कारखानदाराला राहुरी कारखाना सुरू व्हावा, असे वाटत नाही.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रवी मोरे यांनी कारखाना बिनविरोध करण्यासंदर्भात सगळे राजकीय मतभेद बाजूला ठेउन चार पॅनलच्या प्रमुख लोकांना सोबत घेऊन निर्णय घ्यावा, अशी भूमिका मांडली.

# तृतीयपंथीयांच्या रोजगारासाठी नवी वाट

## राज्यातील पहिलं शेळीपालन केंद्र चितळी येथे साकार !

**शिर्डी** : समाजकल्याण सहायक आयुक्त कार्यालयाकडून मिळालेल्या शासकीय मदतीच्या व सप्रेम सामाजिक संस्थेच्या पाठबळामुळे श्रीरामपूर येथील तृतीयपंथी समाजसेवा संस्थेने राहाता तालुक्यातील चितळी येथे तृतीयपंथीयांच्यावतीने चालविण्यात येणारा राज्यातील पहिला शेळीपालन प्रकल्प साकार केला आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील तृतीयपंथी समुदायाला स्वतः च्या पायावर उभं राहण्यासाठी रोजगाराची नवी वाट उपलब्ध झाली आहे, अशी भावना तृतीयपंथी समाजसेवा संस्थेच्या सचिव दिशा पिंकी शेख यांनी व्यक्त केली.

तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण या योजनेंतर्गत राज्यातील पहिल्या तृतीयपंथीय शेळीपालन केंद्राचे उद्घाटन समाजकल्याण सहायक आयुक्त प्रविण कोरगंटीवार व श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी किरण सावंत पाटील यांच्या हस्ते चितळी येथे पार पडलं.



या वेळी श्री. कोरगंटीवार म्हणाले, ''समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने व स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आहे. तृतीयपंथीयांनी स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारून शेळीपालन व्यवसायास सुरुवात केली, ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. शेळीपालनासारखा पारंपरिक व उत्पन्नक्षम व्यवसाय आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवतो. या मार्गावर चालल्यामुळे तृतीयपंथीयांना आर्थिक स्थैर्याबरोबर आत्मसन्मानही मिळणार आहे.''

श्री. सावंत पाटील म्हणाले, ''तृतीयपंथीयांच्या घरकुल व स्मशानभूमीसाठी शिरसगाव येथे तीन एकर जागा मंजूर करण्यात आली असून ती जागा लवकरच त्यांच्या नावावर केली जाणार आहे. तृतीयपंथीयांच्या पाठीशी शासन नेहमीच खंबीरपणे उभं आहे. यासाठी तृतीयपंथी समुदायाने एक पाऊल पुढे टाकून शासनासोबत काम करण्याची गरज आहे.''

या वेळी पंडीत वाघेरे, डॉ. प्रकाश गायकवाड, पिंकी शेख व दिशा शेख यांनीही आपली मनोगतं व्यक्त केली. कार्यक्रमात राहत रेशम पवार, अनु नुरजहॉं शेख, सायली किरणगुरू सोनवणे यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी असलेली तृतीयपंथीय ओळखपत्रं वाटप करण्यात आली.

यावेळी श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, गटविकास अधिकारी प्रविण सिनारे, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, राहाता गटविकास अधिकारी पंडीत वाघेरे, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, नायब तहसीलदार बाळासाहेब मुळे, चितळीचे सरपंच नारायणराव कदम, तृतीयपंथी समाजसेवा संस्थेच्या अध्यक्षा पिंकी शेख, उपाध्यक्ष तमन्ना शेख, सचिव दिशा शेख व सप्रेम संस्थेचे डॉ. प्रकाश गायकवाड तसेच चितळी ग्रामस्थ, तृतीयपंथीय समुदायातील लोक उपस्थित होते.

### असं आहे पशुपालन केंद्र –

▸ तृतीयपंथी समाजसेवा संस्थेने चितळी शिवारात तीन एकर जागा खरेदी केली असून, समाजकल्याण विभागाच्या पाच लाख रुपयांच्या शासकीय मदतीतून साधारणतः दोन हजार चौरस फूट क्षेत्रात पशुपालन शेड उभारण्यात आला आहे. सध्या या केंद्रात १६ बकऱ्यांचं पालन केलं जात आहे. पशुपालन करणाऱ्या तृतीयपंथीयांच्या निवाऱ्यासाठी शेड शेजारीच एक हजार चौरस फूट क्षेत्रात निवासस्थानाचे बांधकाम सुरु आहे. या जागेत निवासस्थान, कूपनलिका व तारेच्या कुंपणासाठी सप्रेम सामाजिक संस्थेने आर्थिक मदत केली आहे.

# नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पंचनामे करा

## माजी खा. लोखंडे; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : तालुक्यातील अवकाळी पावसाने नुकसान



झालेल्या शेतकऱ्यांचे त्वरित पंचनामे करावे व शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करण्यात यावी, अशी मागणी माजी खासदार सदाशिवराव लोखंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

खा. लोखंडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अकोले तालुक्यामध्ये बिगर मोसमी मान्सूनपूर्व पाऊस मोठ्या प्रमाणात झाला असून शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. मुळा प्रवरा व आढळा तसेच आदिवासी भागांमध्ये अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान केले. वादळ, वाऱ्यामुळे शेड, घरांचे नुकसान झाले आहे. पिंपळदरी, चास, लिंगदेव, लहीत, खडकी, शिसवद वांजुळशेत, शेलद या भागात शेतीचे नुकसान झाले असून कांदा पिकाचे ही अतोनात नुकसान झाले आहे. उन्हाळी बाजरीचे पण नुकसान झाले आहे.

शेतात उभा असणारा भाजीपाला पिके सडली आहेत. टोमॅटो, फ्लावर, कोबी पिके वाया गेली असून, कोथांबीर पिक ही सडले आहे. कळस येथे झाड पडून शेतकरी दगावला आहे. पिंपळदरी येथे कुकूटपालन शेड पडून कोंबड्यांची पिले मेली आहे. या सर्वांचे पंचनामे करून तातडीने मदत मिळावी असे ही निवेदनात म्हटले आहे. या निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजितदादा पवार यांना देण्यात आलेले आहे.

# अकोले तालुक्यात अवकाळी पावसाचा हाहा:कार

## शेती पिकांचे नुकसान; तातडीने मदत करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : तालुक्यातील बहुतांश भागात सलग पाचव्या दिवशी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावर व शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी साठले होते. अकोले शहर व परिसरात काल दुपारच्यावेळी एक ते दीड तास जोरदार पाऊस पडला. आढळा व प्रवरा विभागात सर्वदूर धुव्वाधार पाउस कोसळला.

आढळा विभागातील समशेरपुर, टाहाकारी, सावरगाव पाट, देवठाण, तांभोळ, विरगाव, पिंपळगाव निपाणी, हिवरगाव, डोंगरगाव, गणोरे, या गावांसह प्रवरा पट्ट्यातील विठे ते कळस पट्ट्यातील सर्व गावांतही दुपारी मुसळधार पाऊस कोसळल्याने रस्त्यावर व शेतांमध्ये पाणीच पाणी साठले होते. ओढे नाले यांचे पाणी नदीला मिळत आहे. त्यामुळे प्रवरानदी पात्र वाहते झाले आहे.



▸ खा. लोखंडे यांनी निवेदनात म्हटले, आदिवासी भागांमध्ये अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान केले. वादळ, वाऱ्यामुळे शेड, घरांचे नुकसान झाले आहे. पिंपळदरी, चास, लिंगदेव, लहीत, खडकी, शिसवद वांजुळशेत, शेलद या भागात शेतीचे नुकसान झाले असून कांदा पिकाचे व उन्हाळी बाजरीचेही अतोनात नुकसान झाले आहे. शेतात उभी असणारी भाजीपाला पिके सडली आहेत. यासंबंधी शेतकऱ्यांच्या पिकांचा पंचनामा करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी ठाकरे गटाचे उपजिल्हा प्रमुख महेशराव नवले यांनी केली आहे.

मुळा विभागातील काही गावांत अवकाळी पावसाने हजेरी लावली. तर आदिवासी भागातील पश्चिम पट्ट्यात अवकाळी पावसामुळे शेती पिकांसह, शाळा खोल्या, ग्रामपंचायत इमारत, घरे, जनावरांचे गोठे, रस्त्यांचे सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन आदिवासी विभागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अकोले तालुक्यामध्ये पश्चिम विभागामध्ये गेल्या तीन ते चार दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवकाळी पाऊस पडत असून या पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात त्वरित पंचनामे करा माजी खा. लोखंडे अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे त्वरित पंचनामे करावे व आर्थिक मदत करण्यात यावी, अशी मागणी माजी खा. सदाशिव लोखंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# मुळा धरणामधील गाळ काढणार

## सर्वसमावेशक धोरण आखण्याची मंत्री विखे यांची सूचना



### राज्यातील ६ प्रकल्प निश्चित

▸ राज्य शासनाने धरणातील गाळ काढण्यासाठी राज्यातील ६ प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर निश्चित केले आहेत. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील उजनी, नाशिक जिल्ह्यातील गिरणा, भंडारा जिल्ह्यातील गोसी खुर्द, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी, अहिल्यानगर जिल्ह्यातील मुळा आणि जळगाव जिल्ह्यातील हातनूर प्रकल्पाचा समावेश आहे. या धरणांतील गाळ काढण्याचा अनुभन लक्षात घेऊन राज्यातील अन्य धरणांतील गाव काढण्याची प्रक्रिया राबविली जाणार आहे.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : धरणातील गाळ काढण्यासाठी अन्य राज्यांनी केलेले धोरण व महाराष्ट्र राज्याचे याबाबतचे असलेले धोरण याचा तुलनात्मक अभ्यास करून राज्याचे सर्वसमावेशक नवीन धोरण तयार करावे, अशा सूचना जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी बुधवारी दिल्या. प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या मोहिमेतील सहा प्रकल्पांत जिल्ह्यातील मुळा धरणाचा समावेश करण्यात आला आहे.

मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात धरणातील गाळ काढण्याच्या कार्यवाहीबाबतची सद्यः स्थिती तसेच वाळू व माती विलगीकरणाबाबत बैठक झाली. मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार तथा मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे; कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता तथा सहसचिव संजीव टाटू यांच्यासह जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

विखे पाटील म्हणाले, की राज्याने धरणातील गाळ काढण्यासाठी केलेले धोरण सुधारित करताना देशातील अन्य राज्यांनी या धोरणात घेतलेल्या बाबी राज्याच्या धोरणात समावेशित करण्यासाठी याचा सखोल व तुलनात्मक अभ्यास करून त्याचा अहवाल एक आठवड्यात सादर करावा.

# श्रीरामपुरातील अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शहरातील एका महाविद्यालयातील साडेसतरा वर्षे वयाच्या अल्पवयीन विद्यार्थिनी बरोबर मैत्री करत तिला शिर्डी येथे नेऊन अत्याचार करण्यात आला. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. आरोपी हा वाशिम जिल्ह्यातील आहे.

आरोपीचे नाव गजानन देशमुख असे आहे. त्याने विद्यार्थिनी बरोबर जानेवारी २०२५ सोशल मीडियाद्वारे ओळख करून घेतली. त्यानंतर त्यांनी एकमेकांना फोन नंबर दिले. दोघांचेही फोनवर संपर्क सुरू झाले. त्याचे रूपांतर मैत्री मध्ये होत गेले. गेल्या चार ते पाच महिन्यांपासून आरोपी विद्यार्थिनीशी संपर्कात आला.

विद्यार्थिनीला महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर भेटायला आला, आपण शिर्डी येथे दर्शनासाठी जाऊ असे तो म्हणाला, मात्र विद्यार्थिनीने प्रारंभी त्याला नकार दिला होता. मात्र आरोपीने तिच्याकडे आग्रह करत मैत्रीचे कारण पुढे केले. अखेर तिला शिर्डी येथे घेऊन जात एका लॉजवर अत्याचार केला. आरोपीने महाविद्यालयात त्यानंतर पुन्हा भेट घेत मोबाइलमध्ये चित्रित केलेले फोटो आई वडील, नातेवाइकांना व भावाला दाखविण्याची धमकी दिली. त्यामुळे भेदरलेल्या मुलीचा गैरफायदा घेत आरोपीने पुन्हा तिला शिर्डी येथे नेले. तेथे दुसऱ्यांदा तिच्यावर अत्याचार करण्यात आला. पीडित विद्यार्थिनीने शहर पोलिस ठाण्यात आरोपी गजानन देशमुख याच्याविरुद्ध अत्याचारप्रकरणी फिर्याद नोंदविली. पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करत घटनेचे गांभीर्य जाणून तातडीने तपासाची चक्रे फिरवली, मंगळवारी रात्री उशिरा त्याला जालना येथून अटक करण्यात आली. आरोपी हा जालना येथे नोकरी करीत होता. पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सुरेखा देवरे या गुन्ह्याचा तपास करीत आहेत. आरोपीने मुली सोबतचे त्याचे फोटो तिच्या भावाला पाठविले होते. त्यामुळे कुटुंब तणावामध्ये गेले होते. आरोपीने मुलीशी लग्न लावून देण्याचा आग्रह कुटुंबीयांकडे धरला होता, अशी माहिती तपासी अधिकारी देवरे यांनी दिली.

# ढोकेश्वर कॉलेजमध्ये बीसीए अभ्यासक्रमास मान्यता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळी ढोकेश्वर** : अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री ढोकेश्वर कॉलेज टाकळी ढोकेश्वर येथील माजी प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव श्रीधर मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या पाठपुराव्यामुळे व तत्कालीन प्राचार्य डॉ. रंगनाथ किसन आहेर कार्यालय अधीक्षक बाळासाहेब गिरी, वरिष्ठ लिपिक उत्तम आगलावे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुदाम वीर पारनेर महाविद्यालयातील बीबीए (सीए) विभाग प्रमुख प्रा. रणजित शिंदे यांच्या सहकार्यातून प्रथमच भारतीय तकनिकी की शिक्षा परिषद यांची बी. सी. ए. या नवीन अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२५- २६ पासून मान्यता दिलेली आहे. सदर बाबतीत अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसार संस्थेचे अध्यक्ष रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदा ॲड. श्रीमती दीपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी यांनी या अभ्यासक्रमासाठी मान्यतेसाठी संस्था स्तरावर परवानगी देऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी संस्था स्तरावर बीसीए कोर्ससाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधिष्ठित उपलब्ध करून दिलेली आहे.

# 'प्रवरे' च्या ४५ विद्यार्थीनींची प्रशिक्षणासाठी निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'ग्रामीण भागातील उत्कृष्ठ महाविद्यालय' म्हणून तिसऱ्यांदा गौरविलेले एकमेव महाविद्यालय असलेल्या लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयामध्ये नुकत्याच धुत ट्रान्समिशन प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर या कंपनीने प्रशिक्षणार्थीसाठी मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. या मुलाखतीमध्ये महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स विभागामधील ४५ विद्यार्थीनींना प्रशिक्षणासाठी संधी उपलब्ध झाली आहे. प्रशिक्षण कालावधीमध्ये सदर विद्यार्थीनींना विद्यावेतन, निवास आणि भोजनाची व्यवस्था कंपनीच्या वतीने केली जाणार आहे. ही अतिशय अभिमानास्पद बाब असल्याचे महाविद्यालयाचे कॅम्प संचालक डॉ.आर.ए. पवार यांनी सांगितले.



महाविद्यालयामध्ये पदवी स्तरावर कला, विज्ञान, वाणिज्य, संगणकशास्त्र, बायोटेक्नॉलॉजी या शाखेअंतर्गत एकूण पदवी-२२, पद्व्युत्तर-१८ व संशोधन केंद्र-१० असे एकूण ५० पदवी, पद्व्युत्तर व संशोधन केंद्रांमध्ये अभ्यासक्रम चालविले जातात. तसेचुमहाविद्यालयात ४० कौशल्याधिष्ठित प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविले जातात. वाणिज्य शाखेअंतर्गत बी.बी.ए. हा अभ्यासक्रम सुरु झाला आहे. महाविद्यालयामध्ये एकूण १० संशोधन केंद्रास विद्यापीठाची मान्यता आहे. या केंद्रांमध्ये १७२ संशोधक आपल्या संशोधनाचे (पीएच. डी.) कार्य करीत असून ३२ संशोधक मार्गदर्शक त्यांना मार्गदर्शनाचे कार्य करीत आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेले १३ प्रमाणपत्र अभ्यासक्रम महाविद्यालयात यशस्वीपणे राबविले जातात. नवसंशोधक यांचेसाठी डिझाईन आणि इनोव्हेशन सेंटर ची सुविधा उपलब्ध आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून कंपनी सेक्रेटरी (कंपनी सरचिटणीस) या अभ्यासक्रमांचे केंद्र सुरु करण्यात आले आहे. याकरिता महाविद्यालयाने कंपनी सेक्रेटरी- पुणे चाप्टरशी सामजस्य करार केलेला आहे. संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटीव संकल्पनेतून सुरु करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र तसेच पोलिस भरती व आर्मी भरती पूर्व तयारी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शकांमार्फत मार्गदर्शन केले जाते. याचेच फलित आज दिसून येत आहे.

महाविद्यालयामध्ये परिसरातील बेरोजगार व शाळाबाह्य युवकांबरोबरच महाविद्यालयीन तरुण-तरुणींना रोजगारक्षम व्यावसायिक अभ्यासक्रमांचे ज्ञान संपादन करता येते असे डॉ. पवार यांनी दिली.सदर प्रशिक्षणार्थीना संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. छाया गलांडे, डॉ. बबनराव आमले यांचे मार्गदर्शन लाभले. या प्रशिक्षण मुलाखती यशस्वी करण्यासाठी संस्थेचे ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलचे प्रा. मनोज परजणे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल वाबळे, डॉ. भाऊसाहेब रणपिसे, डॉ. शांताराम चौधरी, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट समितीचे डॉ. हरिभाऊ डुबे, एकनाथ सरोदे, आप्पासाहेब शेळके यांनी परिश्रम घेतले.

### यांनी केले विद्यार्थ्यांचे अभिनंदन

▸ या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील,जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालीनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे पाटील, संस्थेचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.शिवानंद हिरेमठ, संचालक डॉ. प्रदिप दिघे यांनी अभिनंदन केले आहे.

# आ. काळेंकडून महारॅलीत सैनिकांप्रती कृतज्ञता

## शहीद वीर जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कोपरगांवकरांच्यावतीने भव्य तिरंगा महारॅली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : पहलगाम येथे झालेल्या हल्याचा बदला घेण्यासाठी पाकिस्तानवर 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम राबविण्यात आली. या 'ऑपरेशन सिंदूर' मोहीमेत शौर्याचे दर्शन घडवून पाकिस्तानला वठणीवर आणणाऱ्या शूर भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ व या मोहिमेत शहीद झालेल्या वीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कोपरगाव शहरात कोपरगावकरांच्या वतीने तिरंगा महारॅली काढण्यात आली.

यावेळी आ. आशुतोष काळे यांनी या महारॅलीमध्ये सहभागी होत देशाचा नागरिक या नात्याने सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरमच्या घोषणांनी कोपरगाव शहर दणाणून गेले होते.

पहलगाम येथे पर्यटकांवर करण्यात आलेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात २६ निरपराध पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता.त्याचा बदला आपल्या भारत देशाने 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम राबवून घेतला असून भारताच्या शुर सैनिकांनी केलेल्या बलाढ्य पराक्रमाने पाकिस्तानला आपल्यापुढे गुडघे टेकावे लागले. परंतु या लढाईत आपल्या देखील काही सैनिकांना वीरमरण आले आहे.

त्यामुळे शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी व वीर जवांनाना संपूर्ण भारत देश तुमच्या पाठीशी असल्याचा विश्वास देवून सर्व सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी समस्त कोपरगावकरांच्या वतीने बुधवार (दि.१४) रोजी तिरंगा महारॅली आयोजित करण्यात आली. यावेळी आ. काळे यांनी देखील या महारॅलीत सहभागी होवून देशाचा नागरिक या नात्याने आपले कर्तव्य बजावले.

### तिरंगा महारॅलीला भरभरुन प्रतिसाद

कोपरगाव शहरासह तालुक्यातील नागरिकांनी या तिरंगा महारॅलीला भरभरुन प्रतिसाद देवून या महारॅलीमध्ये सहभागी होवून देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विघ्नेश्वर मंदीरापासून सुरु झालेली ही महारॅली छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, महात्मा गांधी स्मारक, श्रीराम मंदिर रोड, छत्रपती संभाजी महाराज स्मारक व त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी येवून सामूहिक राष्ट्रगीताने या महारॅलीची सांगता झाली.



## जामखेडमध्ये गुटखा विक्रीचा भांडाफोड




**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेडमध्ये मानवी आरोग्यास हानिकारक अशा गुटखा व पानमसाल्याची विक्री खुलेआम चालू असताना पोलिसांनी त्यावर छापा टाकला. या छाप्यात २२,१८९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, मात्र आरोपी फरार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. हे प्रकरण खर्डा रोडवरील जनता ट्रेडर्स नावाच्या दुकानातील असून, आरोपी फजल उमर कुरेशी, अजियान रफिक कुरेशी यांनी जामखेड सदाफुले वस्तीतील या दुकानातून गुटखा विक्री करत असल्याची माहिती मिळाली आहे.

पोलिसांनी १२ मे २०२५ रोजी या दुकानावर छापा टाकून गुटखा व पानमसाल्याची विक्री सुरू असल्याचे ओळखले. या प्रकरणी आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले असताना, ते अद्याप फरार असल्याची चर्चा जामखेड तालुक्यात सुरू आहे. पोलिसांना मुद्देमाल मिळतो पण आरोपी मिळत नाहीत, यामुळे पोलिसांच्या कारवाईवर नागरिकांमधून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

सदर प्रकरणात मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे आणि आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र आरोपी अटकेत नाहीत, यामुळे नागरिकांमध्ये विविध प्रश्न व चर्चा सुरू असून पुढील तपास जामखेड पोलीस करत आहेत.

# 'रयत'च्या विद्यार्थ्यांची इस्त्रो सहलीसाठी निवड

## साई आवारे राज्यात चतुर्थ तर ओम आवारे राज्यात सातवा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी** : उत्तुंगतेज फाउंडेशन मार्फत दरवर्षी घेण्यात येणाऱ्या उत्तुंगतेज बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेचा निकाल जाहीर झाला.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी व त्यांनी भविष्यात शास्त्रज्ञ बनण्याची स्वप्न बघावी या उद्देशाने उत्तुंगतेज फाउंडेशनचे संस्थापक रामेश्वर हालगे यांनी राज्यभर विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मला शास्त्रज्ञ व्हायचं ही चळवळ सुरू केली आहे.

सन २०२४ मध्ये झालेल्या परीक्षेत रयतच्या प. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील विद्यालय, लोणी विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली यामध्ये साई विनोद आवारे हा मोठ्या गटात राज्यात प्रथम आला असून ओम विनोद आवारे याने मोठ्या गटात सातवा क्रमांक पटकावला आहे.

या दोनही विद्यार्थिनींची निवड ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी झालेली आहे. सदरची निवड ही लेखी व मुलाखती द्वारे करण्यात आली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक व विभाग प्रमुख वऱ्हाडे जी. डी. व विद्यालयातील विज्ञान शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. तसेच उत्तुंगतेज फाउंडेशन चे संस्थापक रामेश्वर हालगे, विद्यालयाचे प्राचार्य श्री रक्टे सर,उपमुख्याध्यापक श्री. डहाळे सर, पर्यवेक्षक श्री. भुसाळ सर, पर्यवेक्षिका श्रीम. कडू मॅडम, विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद व पालक यांचे प्रोत्साहन लाभले.

### दोन्हीही विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव

यशस्वी विद्यार्थ्यांचे अरुण कडू पाटील, मॅनेजिंग कौंसिल सदस्या मीनाताई जगधने, एकनाथराव घोगरे पाटील, आ. आशुतोष काळे, विभागीय अधिकारी बोडखे साहेब, सहा. विभागीय अधिकारी तोरणे, नाईकवाडी, बाळासाहेब विखे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य जनार्धन घोगरे पाटील व उत्तमराव आहेर यासह आदी पालकांनी अभिनंदन केले.



## संभाजी महाराज नेहमीच अन्यायाविरोधात लढत राहिले

### पोलीस निरीक्षक महेश पाटील; जामखेड येथे संभाजी महाराज यांची जयंती साजरी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज हे नेहमी अन्याय व चुकीच्या रुढी परंपरा विरोधात लढत राहिले आहेत. त्यांच्या विचारान प्रमाणे तुमचा अचार, विचार व उद्देश चांगला पाहिजे, तसेच सर्व सामान्यांना न्याय देण्याचे काम केले पाहिजे असे मत पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी छत्रपती शंभुराजे यांच्या जयंतीच्या निमित्ताने व्यक्त केले.

छत्रपती संभाजी महाराज यांची ३६८ वी जयंती देशभरात श्रद्धा आणि अभिमानाने साजरी केली जात आहे. केवळ मराठा इतिहासातच नव्हे, तर संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात धर्मासाठी प्राणार्पण करणाऱ्या महान योद्ध्यांमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचे स्थान सर्वोच्च आहे.

याच अनुषंगाने आ. रोहीत दादा पवार मित्र मंडळ व शंभुराजे कुस्ती संकुल जामखेड यांच्या वतिने मंगेश आजबे यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड शहरातील खर्डा चौकात दि. १४ मे रोजी सकाळी दहा वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते संभाजी महाराजांच्या मूर्तीचे विधिवत पूजन करण्यात आले.

यावेळी मंगेश आजबे, सुर्यकांत मोरे, विजु कोठारी बापू कार्ले, पांडुराजे भोसले, संपत राळेभात, सुंदरदास बिरंगळ, चिराग आजबे, उमर कुरेशी, गणेश हगवणे, नरेंद्र जाधव यांच्यासह आदी नागरिक उपस्थित होते.

# हॉटेल मालकावर हल्ला करणारे गजाआड

## सराईत आरोपींना शिंगणापूर पोलिसांनी केली अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : शिंगणापूर येथे दि. ११ मे रोजी रात्री हॉटेल यश गार्डन येथे हॉटेल मालकावर मारहाण करून हॉटेलच्या काउंटर मधून २२ ते २३ हजार रुपये घेऊन गेल्याची फिर्याद दाखल झाली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके यांनी घटनेतील दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे.




शिवाजी यशवंत शेटे (वय ५९, व्यवसाय शेती, हॉटेल) यांनी शिंगणापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. टीक्त म्हटले आहे की, दि. ११ मे रोजी रात्री हॉटेलमध्ये काउंटरवर बसलेलो असताना हॉटेलमध्ये आलेल्यांनी धारदार वस्तूने डोक्यात मारले व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून दिवसभरातील हॉटेलमध्ये जमा झालेली २२ ते २३ हजार रुपयांची रक्कम घेऊन गेले.

या फिर्यादीवरून शिंगणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तात्काळ तपास करून यश उर्फ भिंगऱ्या जालिंदर भिंगारदिवे व सनी उर्फ मध्या किसन शिंदे या दोघांना स्थानिक गुन्हा शाखेच्या मदतीने २४ तासाच्या आत ताब्यात घेऊन अटक केली आहे. आरोपींना न्यायालयापुढे उभे केले असता न्यायालयाने १७ मेपर्यंत आरोपींना पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदर कारवाई वेळी शनिशिंगणापूर पोलीस स्टेशनचे स.पो.नि. आशिष शेळके सो, सहाय्यक फौजदार नितीन सप्तर्षी, सहाय्यक फौजदार ज्ञानेश्वर माळवे, पोहेकाँ रमेश लबडे, चा.पो.काँ. संतोष मुरकुटे, मारुती पवार,पोकाँ अमोल पोंधे, पोकाँ अजय ठुबे, महिला पोलीस कॉन्स्टेबल वृषाली गर्जे, स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगरचे पोहेकॉ ज्ञानेश्वर शिंदे, पोहेकॉ गणेश भिंगारदिवे, पोना. अशोक लिपने, पोकॉ. भगवान थोरात, पोकॉ रोहित येमुल यांच्या मदतीने सदरची कारवाई केली आहे.

# मुलिकादेवी विद्यालयाचा ९७.३५ टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे निघोज येथील श्री मुलिकादेवी माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता १० वीचा निकाल शेकडा ९७.३५ टक्के लागला असून परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी निकालाची परंपरा कायम राखत चांगले यश संपादन केले आहे.



कुरकुटे प्रिया ९४.२० % | इनामदार रूमान ९४. ३० % | सोनवणे ऋतुजा ९३.४० % | निचित आयुष ९३ % | परांडे सार्थक ९१.४० % | झोडगे मधुरा ९१.२० %

या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षक खोसे, बेलोटे, धानापुने, इंगळे, काळे, काकडे, औटी, लोखंडे, इनामदार, गोरखे, शिक्षिका वराळ, दिघे, सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी प्रथम पाच विद्यार्थी पुढीलप्रमाणे मुरकुटे प्रिया संदीप शेकडा ९४.२० टक्के, इनामदार रुमान मोहंमद उमर शेकडा ९४.२० टक्के, सोनवणे ऋतुजा विकास शेकडा ९३.४० टक्के, निचित आयुष अनिल शेकडा ९३ टक्के, परांडे सार्थक संतोष शेकडा ९१.४० टक्के, झोडगे मधुरा नवनाथ शेकडा ९१.२० टक्के गुण प्राप्त करून विद्यालयाचा नालौकिक वाढविला आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांवर शुभेच्छा

यशस्वी विद्यार्थ्याचे नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे माजी अध्यक्ष नंदकुमार झावरे, जेष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कौन्सिलिंग सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, राहुल झावरे आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# सुखदेव फुलारी यांना स्व.सोपानराव दरंदले पत्रकाररत्न पुरस्कार प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा**: नेवासा तालुक्यातील सोनई येथील पसायदान आनंदवन सेवाभावी संस्थेच्या वर्धापनदिना निमित्त देण्यात येणारा स्व.सोपानराव दरंदले पत्रकार रत्न पुरस्कार भेंडा येथील पत्रकार तथा जलमित्र सुखदेव फुलारी यांना सद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उध्दव महाराज मंडलिक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सोनई येथे पसायदान आनंदवन संस्थेच्या ध्यानमंदीर प्रांगणात झालेल्या कार्यक्रमास साहित्यिक एन. बी. धुमाळ व शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष भागवत बानकर, साई आदर्श मल्टीस्टेटचे अध्यक्ष शिवाजीराव कपाळे, विठ्ठल महाराज खाडे, प्राचार्य डॉ. गोरक्षनाथ



कल्हापुरे, मुळा कारखान्याचे व्यवस्थापक शंकरराव दरंदले, मुळा बँकेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब निमसे, डॉ. बाबासाहेब शिरसाठ, आनंदवन संस्थेचे अध्यक्ष उदय पालवे, उपाध्यक्ष विनायक दरंदले, सचिव संजय गर्जे, पत्रकार सुनील दरंदले आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उध्दव महाराज म्हणाले की, लौकिकता प्राप्त करायची असेल, तर परिश्रमास दुसरा कुठलाच पर्याय नाही. शॉर्टकट मार्ग पत्करून झटपट श्रीमंतीचा मिळू शकते. मात्र, त्यात आत्मिक समाधान नसते. तुमचा उध्दार आणि तुमची प्रतिमा घरातील भावी पिढीच्या मनावर बिंबत असल्याने वागणुकीचे प्रत्येक पाऊल विचारपूर्वक टाकले जावे. पुरस्कारार्थी राजाराम कुसळकर (उद्योजक), दत्ता हापसे (कार्यकर्तृत्व) व ब्रम्हाकुमारी उषादिदी (अध्यात्म) यांना पसायदान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष स्व. सोपानराव दरंदले यांची स्मृती जागृत रहावी म्हणून सुरु करण्यात आलेला पहिला स्व.सोपानराव दरंदले पत्रकार रत्न पुरस्कार महंत उद्धव महाराज मंडलीक यांचे हस्ते प्रदान करण्यात आले.

## पी. ए. इनामदार इंग्लिश मिडियम स्कूलचा दहावीचा ९८ टक्के निकाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या गोविंदपुरा येथील पी. ए.इनामदार इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थ्यांनी यावर्षीही यशाची परंपरा कायम ठेवली शाळेतील ११४ विधार्थांनी दहावीची परीक्षा दिली त्यापैकी ११२ विधार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. व दहावी बोर्डाच्या मार्च २०२५ च्या परीक्षेत शाळेचा निकाल ९८ टक्के लागला. यामध्ये शाळेचे विद्यार्थि शेख यासीन अंन्सार याने ९२.६० टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळवला. तर द्वितीय शेख मदीहा समशेर ९१.४०, तृतीय शेख मोहंमद अफ्फान अंन्सार ८८.६० टक्के गुण प्राप्त केले.



या यशाबद्दल कॉलेजचे प्राचार्य फिरोसअली मराक्कटील, उप प्राचार्या फरहाना शेख तसेच संस्थेचे चेअरमन अब्दुल रहीम खोकर, व्हा.चेअरमन इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, खजिनदार डॉ. खालीद शेख, अकॅडमीक डायरेक्टर शब्बीर मोहंमद सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले.

# 'संजीवनी'ने जपली १०० टक्के निकालाची परंपरा

## संजीवनी अकॅडमीचा श्रेय महिंद्रकर व ईश्वरी लोहकणे ९९ टक्के गुण मिळवुन प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रवारी २०२५ मध्ये घेतलेल्या इ. १० वीच्या परीक्षांचे निकाल जाहिर केले असुन यात संजीवनी अकॅडमीच्या प्रतिभावंतानी स्कूलची १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यात श्रेय रूपेश महिंद्रकर याने व ईश्वरी निलेश लोहकणे या दोघांनीही ९९ टक्के गुण मिळवुन आपल्या प्रतिभा संपन्नतेचे दर्शन घडवत स्कूलमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तिर्ण होण्याचा बहुमान पटकाविला.

श्रेयन संतोष भोर हा ९७.२० टक्के गुण मिळवुन दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला. रियांश जयप्रकाश कारवा याने ९७ टक्के गुण मिळवुन तिसरा क्रमांक मिळविला. सिध्दांत विलास महिरे यांने ९६. ४० टक्के मिळवुन चौथ्या क्रमांकावर शिक्कामोर्तब केले. एकुण ९७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. उत्कृष्ट निकालाने संजीवनी अकॅडमीने आपला शैक्षणिक दर्जा पुन्हा एकदा सिध्द केला आहे, असे संजीवनी अकॅडमीने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. पत्रकात पुढे म्हटले आहे की श्वेता विजय मोरे व आर्या सुजितकुमार सोनवणे यांनी प्रत्येकी ९६.२० टक्के गुण मिळविले. तसेच संस्कार संतोष बेलदार याने ९५. ८०, निशिगंधा शांताराम वाबळे हिने ९५.४०, आदित्य धर्मराज भामरे व पार्थ दत्तात्रय रहाणे यांनी प्रत्येकी ९५.२० टक्के गुण मिळविले. १२ विद्यार्थ्यांनी ९५ टक्यांपेक्षा अधिक गुण मिळविले. ९० टक्यांच्या पेक्षा अधिक ३४ व ८० टक्यांपेक्षा अधिक ६६ विद्यार्थ्यांनी गुण मिळविले.

मराठीमध्ये ६ व संस्कृत या विषयामध्ये २ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले. इंग्रजी विषयात ४८ विद्यार्थ्यांनी हिंदी, मराठी व संस्कृत हे विषय मिळून ५६, गणित विषयात १०, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विषयात ७८, सायन्स विषयात १५ व सोशल स्टडीज विषयात २५ विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९० पेक्षा अधिक गुण मिळविले.

### संजीवनीच्या शिरपेचात मानाचा तुरा

संजीवनी अकॅडमीचे विद्यार्थ्यांनी विविध खेळ, सांस्कृतिक, विज्ञान प्रदर्शन, तांत्रिक स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, अशा प्रत्येक बाबतीत बक्षिसे मिळवुन आपली आघाडी सिध्द केली आहे. आता शैक्षणिक गुणवत्तेमध्ये १०० टक्के निकाल देवुन स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

### दिग्गज मान्यवरांकडून कौतुकांचा वर्षांव

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, स्कूलच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक, एक्झिक्युटिव्ह प्रिंसिपाल रेखा पाटील, प्रिंसिपाल शैला डुबे, सर्व शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.



## पारेश्वर विद्यालयाची उज्ज्वल यशाची परपरा कायम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : वैजापूर तालुक्यातील पालखेड श्री पारेश्वर विद्यालयातील मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एसएससी बोर्ड परीक्षेचा निकाल ९५.८३ टक्के लागलेला असून यावर्षीही शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

विद्यालयातून एकूण ९७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ९२ विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत. तसेच विशेष प्राविण्य श्रेणीमध्ये २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर प्रथम श्रेणीत ३६ विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत. द्वितीय श्रेणीत २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयातून मुलमुले गीतांजली रामकिसन ९१.६० टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. रोहित विष्णू शिंदे व गौरव गोरख कोल्हे ९० टक्के गुण घेऊन द्वितीय तर अमृता नानासाहेब अनर्थे ८६.६० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे.

### यशस्वी विद्यार्थ्यांवर कौतुकांचा वर्षांव

संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र मुरलीधर शेळके, संस्थेचे सचिव विजय कुमावत, विद्यालयाचे मुख्याध्यापक वासुदेव बानाईतकर, पालखेड ग्रामपंचायतच्या सरपंच वर्षाताई गोरे, उपसरपंच भानुदास जगदाळे ग्रामस्थ, शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## विधानमंडळाच्या लेखा समितीवर आ. तांबे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** महाराष्ट्र विधानमंडळाच्या सर्वाधिक महत्त्वाच्या आणि जबाबदारीच्या समित्यांपैकी एक असलेल्या लोक लेखा समितीवर आ. सत्यजीत तांबे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानमंडळ सचिवालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रानुसार, लोक लेखा समितीवर आ. तांबे यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. लोक लेखा समिती ही राज्य शासनाच्या खर्चावर, आर्थिक निर्णयांवर आणि नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या अहवाल-ावर आधारित चौकशी व शिफारसी करणारी अत्यंत प्रतिष्ठेची संसदीय समिती आहे. या समितीचे अध्यक्षपद विरोधी पक्षनेत्याकडे असते, आणि सध्या ते काँग्रेस पक्षाचे गटनेते आ. विजय वडेट्टीवार भूषवत आहेत. या निवडीमुळे युवकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तांबे यांच्यावर आता राज्याच्या आर्थिक पारदर्शकतेसाठी जबाबदारीची नवी जबाबदारी येऊन ठेपली आहे. त्यांनी यापूर्वीही विधी, आरोग्य, शिक्षण, शेती, पदवीधरांचे प्रश्न, विनाअनुदानित संस्थांचे विषय, तसेच डॉक्टर, वकील, इंजिनियर यांच्याशी संबंधित अनेक विषय विधान परिषदेत अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले आहेत. आ. तांबे यांनी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या परंपरेचा वारसा चालवत, माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी दशेपासूनच सामाजिक, शैक्षणिक आणि युवकविषयक कामांना प्राधान्य दिले आहे. त्यांच्या या निवडीचे उत्तर महाराष्ट्रासह राज्यभरातून जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे.

# राममंदिर उभारण्यामागे अनेक कार्यकर्त्यांचा त्याग

## आ. सोनवणे; ब्राम्हणवाडा येथे भक्तिमय सोहळ्याचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** छत्रपती शिवरायांच्या हिंदुत्ववादी विचारातून देशाचे पंतप्रधान मोदीजी काम करत आहे. राममंदिराची उभारणी ही त्या मागची प्रेरणा होय यात शंकरजी गायकरांसारखे अनेक हिंदुत्व-वादी कार्यकर्त्यांचे कार्य दडलेले आहे, असे गौरव उद्गार जुन्नर तालुक्याचे आमदार शरद दादा सोनवणे यांनी काढले.

ब्राम्हणवाडा येथे विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री व राष्ट्रीय प्रवक्ते शंकर भाऊराव गायकर यांनी द्वितीय नर्मदा माता पायी परिक्रमा यशस्वीरित्या पूर्ण केली. या पवित्र कार्याच्या सांगतेनिमित्त भक्तिमय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महामंडलेश्वर बाळानंद महाराज कोंडार, अकोलेचे माजी आमदार वैभवराव पिचड, संगमनेरचे आमदार मा. अमोल खताळ यांच्या पत्नी नीलमताई खताळ, श्री-क्षेत्र शिवशक्ती गड, तुळजवाडी ह.भ.प. संतोषानंद महाराज, पंचगंगा उद्योग समूहाचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे, भाजपा जिल्हा अध्यक्ष नितीनजी दिनकर, सितारामजी भांगरे, भाऊसाहेब वाकचौरे, जिल्हा परिषद गटनेते जालिंदर वाकचौरे, मोहित ढमाले,



संगमनेरचे उपविभागीय अधिकारी कुणाल सोन-वणे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, भाजपा मंडल अध्यक्ष राहुल देशमुख, वाल्मिक नवले, बाळासा-हेब सावंत, माजी उपसरपंच भारत आरोटे, ॲड. के. बी. हांडे, गोकुळ आरोटे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सचिन आरोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

माजी आ. वैभव पिचड यांनी पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी मोदीजींनी सिंदूर ऑपरेशन केले. धर्म विचारून मारणारे दहशतवादी आहेत. आज हिंदुत्व विचार पसरत आहे. यामागे शंकरजी गायकरांसारखे अनेक व्यक्तिमत्त्वांचा त्याग आहे.

निलम खताळ या बोलताना म्हटल्या की, विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आम्ही देव आणि धर्म वाचविण्यासाठी मतदान करा, अशी विनंती केली आणि हा मुद्दा मतदारांना भावला. एक आदर्श शक्ती जीवनात पाठीमागे असते अशी नेहमी वाटत होत ती आदर्श शक्ती आज समोर आली. संगमनेर मध्ये हिंदुत्वाचे मुद्द्यासाठी काम करण्याची संधी त्यांनी दिली. जिल्हा परिषद गटनेते जालिंदर यांनी बोलताना म्हटले की, आज भारत देशात जे हिंदुत्वाचे वातावरण तयार झाले आहे त्यामागे विश्व हिंदू परिषदेचा मोलाचा वाटा असून यामध्ये राष्ट्रीय महामंत्री म्हणून शंकरजी गायकर यांचा कार्य अनमोल आहे. स्वागत पांडुरंग गायकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रदिप भाटे यांनी तर आभार बाळासाहेब गायकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथर्व गायकर, किरण गायकर यांनी प्रयत्न केले.

आ. सोनवणे बोलताना म्हणाले की, छत्रपती शिवरायांनी तोरणा किल्ला घेतला. त्यावेळेस मोगल सत्ता त्यांना हसत होत्या. परंतु स्वराज्य घडवलं आणि औरंगजेबाला याच मातीत गाडलं तसंच कार्य अटलजी आडवाणी यांनी रथयात्रा काढली. त्यावेळेस ७० टक्के देश त्यांना हसत होता. मात्र त्या वेळी दिलेले आश्वासन मोदीजींनी पूर्ण केली भव्य राम मंदिर उभारले, ३७० कलम हटवले. यासाठी अनेक हिंदुत्वव-ादी कार्यकर्त्यांनी आपले जीवाचे बलिदान दिले अशीच प्रेरणा शंकरजी गायकर यांनी आपल्या आयुष्यात जपली, असे गौरव उद्गार काढले.

## अवैध मद्य विक्रेते उत्पादन शुल्कच्या रडारवर

### हॉटेल्स व ढाब्यांवर कारवाई; ३४० व्यक्तींविरूध्द गुन्हे दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील महामार्गालगत असलेले हॉटेल व ढाबे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या रडारवर आले आहेत. विभागाने एप्रिल महिन्यात अवैध हॉटेल्स व ढाब्यांवर विना परवाना मद्यविक्री सेवन करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबवली. या मोहिमेत जिल्हाभरातून ३४० व्यक्तींविरूध्द एकूण २०३ गुन्हे नोंदवले गेले आहेत. कारवाईदरम्यान कलम ६८ (हॉटेल /ढाबा चालक) व ८४ (मद्यपी व्यक्ती) अंतर्गत ६९ गुन्ह्यांची नोंद झाली. या मोहिमेत चार लाख ८४ हजार ३१८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे राज्य आयुक्त यांच्या निर्देशानुसार अधीक्षक प्रमोद सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम १ एप्रिल ते ४ मे २०२५ या कालावधीत अंमलात आणली गेली. अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी विभागाने



जिल्ह्यातील हॉटेल्स, ढाबे आणि अनधिकृत मद्यविक्रीच्या ठिकाणी अच-ानक छापे घातले. यावेळी बेकायदेशीर मद्य साठा, परराज्यातून आणलेले मद्य, तसेच मद्यसेवन करताना आढळून आलेल्या व्यक्तींवरही कारवाई करण्यात आली. तसेच, १० मे रोजी आयोजित लोकअदालत मध्ये या मोहिमेदरम्यान नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी १६ गुन्ह्यांचा निकाल लावण्यात आला. यामध्ये ६ धाबा चालकांवर कलम ६८ अंतर्गत, तर १० मद्यपींवर कलम ८४ अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात आली. प्रत्येकी १३ हजार रुपये प्रमाणे एकूण ६५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

ही मोहीम अधीक्षक सोनोने यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली असून, भविष्यात देखील अशा कारवाया अधिक जोमाने सुरू राहतील, असे अधीक्षक सोनोने यांनी सांगितले. राज्य उत्पादन शुल्क विभागाने १ जानेव-ारी ते ३० एप्रिल या कालावधीत अवैध मद्यविक्री, हातभट्टी/भेसळयुक्त मद्यनिर्मिती, परराज्यातील मद्याची वा-हतूक, तसेच बेकायदेशीर स्पिरीट विक्री याविरोधात व्यापक स्तरावर कारवाई करण्यात आली आहे. या कालावधीत एकूण ९५५ व्यक्तींविरूध्द ९६९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. कारवाईदरम्यान ३९ वाहने जप्त करण्यात आली असून, जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे १ कोटी ४८ लाख ७१ हजार ३१८ रुपये इतकी आहे.

## पाथरवाला विद्यालयाचा ८८.२३ टक्के निकाल

कुकाणा : नेवासा तालुक्यातील कुकाणा ग्रामसेवा मंडळ संचलित पाथरवाला माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा ८८.२३ टक्के निकाल लागला विद्यालयाने उत्कृष्ठ निकाकाची परंपरा कायम राखली असुन विद्यालयातील भक्ती संदीप थोरे हीने ७८. ६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर अश्विनी विजय पावसे या विद्या-र्थीनी ने ७१. ६० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक आणि वैष्णवी विजय गाडेकर हीला ७१.२० टक्के गुण मिळाले तीच तृतीय क्रमांक आला. मागील वर्षा प्रमाणे यंदाही मुलींनीच बाजी मारली. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक रमेश खाटीक, क्रीडा शिक्षक सुनिल पंडित , अध्यापक चंदकांत गुंड, ईसमाल शेख, चंद्रकांत कचरे, कैलास म्हस्के, संदिप लिपणे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कुकाणा ग्राम सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. देसाई देशमुख, सचिव माजी आमदार पांडुरंग अभंग,ॲड. हिम्मतसिंह देशमुख, मार्केट कमिटीचे माजी संचालक दत्तात्रय खाटीक शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदिप झिरपे, हरिभाऊ थोरे , संभाजी खाटीक प्रा. दिपक खाटीक, सामाजिक कार्यकर्ते याकुबभाई शेख यांच्यासह ग्रामस्थांनी कौतुक केले.

## पुणे बसस्थानकावर महिला चोरट्यांचा सुळसुळाट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** - शहरातील पुणे बस स्थानकावर बस मधून उतरत असताना महिलेच्या बॅगमधील एक तोळ्याचे सोन्याचे नेकलेस दोन महिलांनी चोरून नेल्याची घटना मंगळवारी (१३ मे) दुपारी ४:२० च्या सुमारास घडली. दोन महिला चोरट्यांनी ही चोरी केल्याचे समोर आले आहे. बस स्थानक परिसरात महिला चोरट्यांचा सुळसुळाट झाला आहे.

या प्रकरणी सुनंदा अरूण भारस्कर (वय ३५ रा. बाबा हॉस्पिटल, दिप बंगला चौक, शिवाजीनगर, पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात दोन अनोळखी महिलांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुनंदा भारस्कर या आपल्या नातेवाईकाच्या लग्नासाठी पुणे येथून एस.टी. बसने समारंभामध्ये घालण्यासाठी त्यांनी आपले अंदाजे ३० हजार रुपये किंमतीचे एक तोळ्याचे सोन्याचे पट्टी नेकलेस त्यांच्याकडील बॅगेत सुरक्षित ठेवले होते. दुपारी साधारणतः



४:२० वाजता पुणे बस अहिल्यानगर येथे प्रवास करत होत्या. लग्न स्थानकावर बसमधून उतरत असताना, गर्दीचा

फायदा घेत एका अनोळखी महिलेने पुढे चला, पुढे चला असे म्हणून सुनंदा यांच्या बॅगेची चेन उघडताना दिसली. त्यांनी तत्काळ तिच्या हालचालींवर संशय घेत पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्या महिलेने सुनंदा यांच्या हाताला हिसका देत पळ काढला. सुनंदा यांनी तात्काळ बॅग तपासली असता, त्यातील सोन्याचे नेकलेस चोरीस गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकारात आणखी एक महिला सहभागी असल्याचा संशय सुनंदा यांनी व्यक्त केला आहे.

## हरेगावात आ. ओगलेंच्या उपस्थितीत बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** मौजे हरिगांव येथील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने सर्वांगीण विकास आराखडा तयार करण्यासाठी आमदार हेमंत उगले यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६ मे रोजी सकाळी ८ वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह येथे बैठक आयोजित केलेली आहे. तरी सदर बैठकीसाठी सर्वांनी स्मारकाच्या विकासासाठी एकत्र येऊन उपस्थित राहावे असे आवाहन. ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत हरेगाव तालुका श्रीरामपूर यांनी केले आहे.

## पिंपरी निर्मळ येथे साईचरित्र पारायण सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पिंपरी निर्मळ :** राहाता तालुक्यातील पिंपरी निर्मळ येथे आज गुरुवारपासून साईचरित्र पारायण सोहळ्याला सुरुवात होणार आहे. येथील साईसेवा ग्रुपकडून गेल्या १६ वर्षापासून या पारायण सोहळ्याचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. बायपास चौकातील हरिहर अमृतेश्वर महादेव मंदिर, भैरवनाथ महाराज मंदिर व दत्त मंदिर परिसरात या पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. १५ ते २३ मे दरम्यान होणाऱ्या या पारायण सोहळ्याच्या निमित्ताने सकाळी श्रींची आरती, पारायण सोहळा, सायंकाळी आरती व सांस्कृतिक कार्यक्रम असे नित्य कार्यक्रम होणार आहेत.

## तब्बल २४ वर्षांनी वर्गमित्र आले एकत्र

### श्री अरण्येश्वर विद्यालयात १० वीच्या वर्गमित्रांचा गेट टुगेदर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जमखेड :** जामखेड तालुक्यातील अरणगाव येथील अरणेश्वर विद्यालयातील सन २००१ / ०२ या शैक्षणीक वर्षातील इ१०वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र येत आपल्या आयुष्यातील अनुभव आठवणी एकमेकांना शेअर करत उत्साहात गेट टुगेदर कार्यक्रम साजरा केला. विविध क्षेत्रात कार्यरत असलेले बहुतेक सर्वच वर्गमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्हाटस्अप ग्रुपच्या माध्यमातून एकत्र असलेल्या सर्वांनी गेट टुगेदर करण्याचा निर्णय घेऊन श्री अरणेश्वर विद्यालय, अरणगाव येथे आपल्या शाळेत पुन्हा एकदा एकत्र येण्याचं ठरलं. विद्यार्थ्यांसह आयुष्याचे धडे देणाऱ्या आपल्या सर्व शिक्षकांनाही यावेळी निमंत्रित करण्यात आलं होत. कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवर शिक्षकांच्या हस्ते दिपप्रज्वलन झाल्यानंतर सिंदुर ऑपरेशन मध्ये शहीद झालेल्या शुरवीरांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.तसेच कार्यक्रमावेळी



ऊपस्थित असलेल्या गावातील सैनिकांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या हस्ते उपस्थित शिक्षकांना त्यांच्या सुंदर फोटोफ्रेम,शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तब्बल २४ वर्षांनी एकत्र आल्यामुळे सर्वजण अत्यंत आनंदात होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. आयुष्याच्या या वळणावार बालपणातील मित्र सवगंड्या सोबत उजाळा देण्याचा आनंद काही वेगळाच होता. या कार्यक्रमासाठी ६० ते ६५विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल गोरे यांनी तर सुत्रसंचालन मनिषा मोहळकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनीषा खर्डे, मनिषा मोहळकर, सुनिता आबासाहेब भोरे, रवी ससाने, महादेव ओंबासे, सचिन राऊत, अनिल यादव, मुनीर शेख, रवी थोरे, रवींद्र झिंजाडे, मिलिंद काळे, सागर शेटे, शरद गवळी, सतीश जायभाय, गहीनाथ कोथमिरे, सुधीर सोनवणे, सुलभा काळे, शिवाजी निगुडे, धनंजय सातव, सुनील महाराज, मच्छिंद्र आंधळे यांनी मोलाचे परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला. विद्यार्थासाठी ट्रॉफी भाजपा अहिल्यानगर महिला आघाडीच्या सरचिटणीस तथा याच समुहातील विद्यार्थीनी मनीषा अर्जुन मोहळकर यांच्या सौजन्याने करण्यात आले.

## प्रकल्प कार्यालयात मनसेचे धरणे आंदोलन




**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** आश्रम शाळेतील ईश्वरी महादू धिंदळे विद्यार्थिनी या विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने राजूर प्रकल्प कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. दि. १३ मे २०२५ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने प्रकल्प कार्यालय, राजूर येथे संबंधित प्रकरणात दोषी असणारे मुख्याध्यापक अधिक्षिका तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, मवेशी व कुसुम कार्यक्रम अंतर्गत तपासणी करणारे डॉक्टरांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी ज्ञानेश्वर लेंडे, सिकंदर पोपेरे, हेमंत पदमेरे, अविनाश बांडे हे मनसे कार्यकर्ते व मुलीचे आई-वडील, मवेशी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

धिंदळे ही विद्यार्थिनी शासकीय आदर्श आश्रमशाळा मवेशी या शाळेत इ ८ वी वर्गात शिक्षण घेत होती. यावेळी कुसुम कार्यक्रमांतर्गत आरोग्य पथक यांचेकडून आरोग्य तपासणी केली. यामध्ये एकूण १७ विद्यार्थी कुष्ठारोग संशयित म्हणून आढळून आले. त्यामध्ये ईश्वरी धिंदळे या विद्यार्थिनीचा समावेश होता. त्यानंतर सदर डॉक्टरांनी या आजारावर प्रतिबंधात्मक औषधोपचार सुरु करण्यास सांगितले. म्हणूनच शाळेच्या कुलप्रमुखांनी संबंधित विद्यार्थिनीच्या आई-वडिलांना याबाबत माहिती दिली. तद्नंतर ईश्वरी धिंदळे हिच्यावर शाळेच्या अधिक्षिका यांच्या निगराणीखाली उपचार करण्यास सुरुवात झाली. यामध्ये सदर विद्यार्थिनीला गोळ्या देणे सुरु केले. सदर गोळ्यांचा उपचार सातत्याने सुरु असताना विद्यार्थिनीची प्रकृती ढासाळत होती. म्हणूनच तिच्या आई वडिलांनी दि. २१ फेब्रुवारी रोजी त्यांनी मुलीला जिल्हा रुग्णालय नाशिक येथे पुढील उपचारासाठी दाखल केले. यानंतर अतिदक्षता विभागात पुढील सात दिवस तिच्यावर उपचार सुरु होते. परंतु, यावर उपचार सुरु असतानाच हा लढा अयशस्वी ठरला आणि दि २७ फेब्रुवारी २०२५ या दिवशी विद्यार्थिनी मृत्यू पावली.

# पाच पिढ्यांची पाण्याची अखेर प्रतीक्षा संपली!

## निळवंडेचे पाणी आल्याने दहेगाव येथे सर्वांच्या चेहऱ्यावर हास्य उमलले



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** तालुक्यातील दहेगाव येथील गावकऱ्यांना गेल्या पाच पिढ्यापासून निळवंडे धरणातून येणाऱ्या पाण्याची प्रतीक्षा होती ती प्रतीक्षा आज धरणातून आलेल्या पाण्यामुळे संपली. यासाठी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे मोलाचे योगदान असल्याचे माजी सरपंच भगवानराव डांगे यांनी सांगितले. आमचे बंधू कै. इंद्रभान डांगे सर यांची निळवंडेचे पाणी येण्यासाठी खूप तळमळ असायची. तसे ते नेहमीच नेत्यांजवळ आपली खंत व्यक्त करत. खरंतर यामध्ये कै. खासदार बाळासाहेब विखे साहेब, ना. राधाकृष्ण विखे साहेब, सौ. शालिनीताई, डॉ. सुजयदादा या सर्वांचे मोठे योगदान या पाणी सोडण्यामध्ये आहे, असे डांगे म्हणाले. दहेगावमधून गोदावरीचा कालवा जातो परंतु पाण्याखाली क्षेत्र फक्त दहा टक्के आहे बऱ्याच शेतकऱ्यांनी विहिरी खोदल्या. दोन चार किलोमीटर वरती पाईपलाईन नेल्या. परंतु कधी लाईट नाही असे प्रकार घडत असायचे. गोदावरी लाभ क्षेत्रात जरी शेती व्यवसाय असला तरी त्याचा पूर्णतः लाभ दहेगाव, पिंपळस या गावांना पूर्ण क्षमतेने कधी मिळाला नाही. अपेक्षा निळवंडेची होती आणि आज अच-ानक दुपारी एक दीडच्या दरम्यान शेतावर चक्कर मारत असताना जवळ जो कातनाला आहे. त्याच्या पश्चिमेला लांडा ओढा म्हणून नाला आहे. ज्या वेळेस पावसा-चे या ओढ्यामधून वाहत असते. त्या वेळेस गावकऱ्यांना वर्षभर त्याचा फायदा होतो. जवळजवळ १०० हेक्टर क्षेत्र या ओढ्याच्या आजूबाजूला ओलिताखाली येऊ येते.

### पूर्वजांनी केलेल्या संघर्षाचा आनंदोत्सव

अशातच दुपारी अचानकपणे सदर लांड्या ओढ्याला निळवंडेचे पाणी दिसले. आणि मन अगदी तृप्त झाले. मनस्वी खूप आनंद झाला. आपल्या पूर्वजांनी घेतलेल्या कष्टाची सोसलेल्या आसूची आठवण झाली त्वरित शेजारीपाजारी सर्व वस्त्यावरती फोन केला. बघता बघता भर उन्हामध्ये महिला व बाल गोपाळ गोळा झाले कुणी नारळ, कोणी कपडा, काहीजण पेढे, खडीसाखर पूजेचे साहित्य घेऊन धावपळीमध्ये या लांडे ओढ्याच्या पाण्याची पूजा करत होती. प्रत्येक जण पाणी उडवून पाण्यामध्ये भिजवून आनंद घेत होता. त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य बघून मनाला खूप समाधान वाटले निश्चितच आपल्या पूर्वजांनी केलेला संघर्षाचा हा आनंद उत्सव होता.



# ‘रोडीज’मध्ये नेहा नाही?

रिॲलिटी शो आवडणाऱ्यांमध्ये ‘रोडीज’चा उल्लेख आवर्जून केला जातो. आजपर्यंत या शोमध्ये अनेक सीझन आले आहेत. ताजी अपडेट म्हणजे शोसाठी चर्चेत असणाऱ्या नेहा धुपियाने ‘एमटीव्ही रोडीज’ सोडले आहे. तिच्या एका पोस्टवरुन असा अंदाज बांधला जात आहे. नेहा धुपिया ‘रोडीज’ मध्ये एका गँग लीडरच्या भूमिकेत दिसते. परंतु आता या शोबरोबरचा तिचा प्रवास संपला आहे. तिनेच शोला निरोप देत असल्याची पोस्ट शेअर केली. यामध्ये लिहिले की, ‘रोडीज’ हा माझ्यासाठी शो नाही तर एक भावना आहे. शोमध्ये कोणी मला सिंहीण म्हटले तर कोणी माझ्या टीम सदस्यांना सिंह म्हटले. याचा अर्थ काय आहे? ‘रोडीज’च्या सेटवर अभिनेत्री भावनिक दिसत होती आणि इतर गँग लीडर्स देखील तिच्यासोबत भावनिक होताना दिसत होते. आता गौतम गुलाटी ‘रोडीज’चा पहिला वाइल्डकार्ड गँग लीडर बनणार आहे.

वरील पोस्टमुळे नेहाला शो सोडण्याचे दु:ख झाल्याचे दिसत आहे. अभिनेत्रीच्या चाहत्यांनीही याविषयी दु:ख व्यक्त केले आहे. ती शोचा भाग नसल्याबद्दल अनेकांनी भावना व्यक्त केल्या आहेत. परंतु तिने काही दिवसांसाठी शूटिंगमधून ब्रेक घेतला असल्याचे काही चाहत्यांचे मत आहे. शो मध्ये ती लवकरच दिसेल, अशी त्यांना खात्री आहे. नेहा धुपिया ही रोडीजच्या निवडक गँग लीडरपैकी एक असून प्रत्येक गोष्टीवर उघडपणे तिने मत व्यक्त केले आहे. गरज पडल्यास ती इतर गँग लीडर्सशी लढण्यास अजिबात घाबरत नाही. अलीकडेच या शोचा एक प्रोमो समोर आला होता, ज्यामध्ये गौतम आणि नेहामध्ये जोरदार वाद झाल्याचे दाखवण्यात आले होते. त्यानंतर ती सेटवरून निघून जाताना दिसली होती. परंतु नेहाने इंस्टाग्रामवर फोटो शेअर केले असून त्यात ती गौतमसोबत दिसत आहे. अशा परिस्थितीत, हे स्पष्ट आहे की आता त्यांच्यामध्ये कोणताही राग नाही आणि तिने या अभिनेत्यामुळे शो सोडण्याचा निर्णय घेतलेला नाही.




# पद्म पुरस्काराने गौरवले

चित्रपटसृष्टीत मोठे योगदान देणाऱ्या कलाकारांना पद्म पुरस्काराने सन्मानित केले जाते. अलिकडेच दिल्लीतील राष्ट्रपती भवनात पद्म पुरस्कार २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या समारंभात उपस्थित राहण्यासाठी चित्रपट जगतातील अनेक प्रसिद्ध आणि दिग्गज व्यक्ती पोहोचल्या होत्या. या दरम्यान, देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी चित्रपटसृष्टीत मोठे योगदान देणाऱ्या कलाकारांना पद्म पुरस्काराने सन्मानित केले.



या देखण्या समारंभात दक्षिणेतील सुपरस्टार नंदमुरी बालकृष्ण यांना सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्विकारण्यासाठी ते आंध्र प्रदेशच्या पारंपरिक पोशाखात दिसले आणि त्यांनी राष्ट्रपतींकडून पद्मभूषण पुरस्कार स्वीकारला.

तमिळ सुपरस्टार अजित कुमार चित्रपटांसाठी चर्चेत असतात. आता यावेळी पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक शेखर कपूर आणि अभिनेत्री शोभना यांनाही पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दिवंगत गझल गायक पंकज उदास यांना मरणोत्तर पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान त्यांच्या पत्नीने स्वीकारला. त्याचप्रमाणे प्रसिद्ध गायक अरिजीत सिंग आणि संगीत निर्माता रिकी केज यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चित्रपटांव्यतिरिक्त सोहळ्यामध्ये क्रीडा, वैद्यकीय, व्यवसाय यासह अन्य क्षेत्रातील अनेक प्रसिद्ध व्यक्तींना पद्म पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

# संताप व्यक्त होतोय



जम्मू–काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना आपले प्राण गमवावे लागले. देशातील नागरिक या घटनेने खूप दु:खी आहेत. चित्रपटसृष्टीशी संबंधित लोकही या हल्ल्यावर संताप व्यक्त करून प्रतिक्रिया व्यक्त करताना दिसत आहेत. नुकताच बॉलिवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकीला या हल्ल्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला. अभिनेत्याने प्रतिक्रिया देताना या दुःखद घटनेमुळे काय नुकसान झाले आहे आणि संपूर्ण देश त्याविरुद्ध कसा एक झाला आहे, हे स्पष्ट केले.

अभिनेत्याने या घटनेवर तीव्र संताप व्यक्त केला आणि म्हटले की, ‘या घटनेबद्दल खूप राग आणि दुःख आहे. मात्र आमचे सरकार यावर सतत काम करत असून दहशतवाद्यांना नक्कीच शिक्षा होईल. घडले ते खरोखरच दुःखद आहे. काश्मीरमधील लोक अतिशय आपुलकीने पर्यटकांचे स्वागत करतात. त्यांचे आदरातिथ्य पैसा आणि इतर सर्व गोष्टींपेक्षा वरचे आहेत.’

दरम्यान अभिनेता अतुल कुलकर्णीही पहलगाममध्ये पोहोचला आणि पर्यटकांना काश्मीरला भेट देण्यास प्रोत्साहित केले. त्याला याबद्दल विचारण्यात आले तेव्हा म्हणाला, ‘काश्मीरी लोकांचे आपल्यावर आणि तिथे येणाऱ्या सर्व पर्यटकांवर खूप प्रेम आहे. या घटनेनंतर एक चांगली गोष्ट घडली आहे ती म्हणजे संपूर्ण देश एकवटला आहे. यातून नक्कीच चांगले चित्र समोर येईल.

# ...म्हणून गरज आहे

अनंत महादेवन यांच्या ‘फुले’ या चित्रपटात महात्मा ज्योतिबा फुले यांची भूमिका साकारल्याबद्दल प्रतीक गांधीचे सध्या सगळीकडे कौतुक होत आहे. या चित्रपटात पत्रलेखा सावित्री फुले यांच्या भूमिकेत आहे. अलिकडेच प्रतीकने एक मुलाखती दिली आणि अनेक बाबींवर चर्चा केली. यावेळी इतिहासात काय घडले याबद्दल आपण आजच्या काळात बोलूही शकत नाही, असे तो म्हणाला. खेरीज या चित्रपटात दाखवलेले सर्व काही पूर्णपणे इतिहासाचा भाग असून ते आपण सर्वांनी शाळेपासून शिकलेले, वाचलेले आहे, असे तो म्हणाला. १७५ वर्षांपूर्वी समाजात जातीभेद, लिंगभेद, महिलांवरील अत्याचार अशा अनेक चुकीच्या गोष्टी होत्या. त्याच पडद्यावर दाखवण्यात आल्या आहेत. या चित्रपटात कोणताही अजेंडा नाही, असेही तो या मुलाखतीत सांगतो. त्यामुळेच काही लोकांनी, गटांनी नाराजी व्यक्त केली वा सेन्सॉर बोर्डानेही आम्हाला काही गोष्टी कमी करण्यास सांगितल्या तेव्हा विचित्र संकेत मिळाले असे तो पुढे म्हणतो. पण सर्वांना सर्वोत्तम उत्तर अनंत महादेवन यांच्याकडून मिळू मिळाले आहे असे तो सांगतो.



तो पुढे म्हणतो, मी कथा ऐकली तेव्हा हृदयाचा एक कोपरा विचारत होता की, आजच्या काळात त्याची प्रासंगिकता किती आहे. पण अनंत महादेवन यांनी संपूर्ण कथानक पूर्ण केले हे सर्व मुद्दे अजूनही आपल्या समाजात असल्याचे जाणवले. १७५ वर्षांपूर्वी सुरू झालेला लढा अजूनही संपलेला नाही. म्हणूनच एक समाज म्हणून आपण खरोखरच या गोष्टींवर विचार केला पाहिजे. अनावश्यक वादांवर वेळ वाया घालवणे चुकीचे आहे.’ मुलाखतीत तो पुढे म्हणतो, ‘देशाच्या सध्याच्या स्थितीबद्दल आणि त्या बाबतीत संपूर्ण जगाचा विचार केला तर आपल्याकडे जातीभेद, लिंगभेद, महिलांवरील अत्याचार, धर्माच्या आधारावर भेदभाव असे कोणतेही प्रश्न नाहीत, असे कोणीही म्हणू शकत नाही.

# पूजाचा पारंपरिक लूक

दक्षिणेकडून बॉलिवूडपर्यंतचा प्रवास करणारी पूजा हेगडे तिच्या लूकमुळे कायम चर्चेत असते. अलिकडेच पूजाने तिचे काही फोटो शेअर केले असून सध्या ते बरेच चर्चेत आहेत. या फोटोंमध्ये पूजाने तिच्या आजीची ७० वर्षांपूर्वीची कांजीवरम साडी परिधान केलेली दिसत आहे. या क्लासिक लूकमध्ये, हिरव्या आणि जांभळ्या रंगाच्या पारंपरिक साडीत ती खूपच सुंदर दिसते आहे. तिने कमीत कमी मेकअपने लूक पूर्ण केला आहे. केसांमध्ये गजरा आणि कपाळावर बिंदी लावून पूजा खूप सुंदर दिसते आहे. सुंदर साडीतील आपले फोटो शेअर करताना तिने लिहिले, ‘कपाटातील ७० वर्षांची सुरेख साडी... ही मला आजीने दिलेली भेट असून एक छान आठवण आहे. ही साडी बघितली की आजीचा चेहरा डोळ्यासमोर येतो. ही पैठणी नेहमीच तिची आठवण करून देते, खास प्रसंगी ती संपूर्ण दिवस कांजीवरम साडीमध्ये घालवत असे. ’ कामाबद्दल बोलायचे झाले तर, पूजा सध्या तिच्या आगामी ’रेट्रो’ चित्रपटाबद्दल खूप उत्सुक आहे. चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त असणारी पूजा सतत उत्तम पोस्ट शेअर करत असते. अभिनेता सूर्या ‘रेट्रो’ मध्ये तिच्यासोबत मुख्य भूमिकेत आहे. चित्रपट निर्मात्यांनी नुकतेच ‘रेट्रो’ चे शीर्षक आणि टीझर सोशल मीडियावर रिलीज केले असून ते प्रेक्षकांच्या पसंतीला उतरत आहे. आता चित्रपट पाहण्याच दोघांचे चाहते उत्सुक आहेत.



टीझरमध्ये पूजा आणि सूर्या एका तलावाच्या काठावर बसलेले दिसतात. पूजा सूर्याच्या मनगटावर रक्षासूत्र बांधणाऱ्या एका गावातील मुलीची भूमिका साकारत आहे. टीझरमध्ये सूर्या म्हणतो आहे की, ‘मी माझा राग नियंत्रित करेन, या क्षणानंतर मी सर्व काही मागे सोडेन. मी हसण्याचा आणि आनंदी राहण्याचा प्रयत्न करेन. माझ्या आयुष्याचा उद्देश शुद्ध प्रेम आहे, फक्त शुद्ध प्रेम...’

# पुन्हा एकदा प्रभास

प्रभासच्या हिट चित्रपटांच्या यादीत ‘बाहुबली’चे नाव पहिले आहे. एसएस राजामौली दिग्दर्शित या चित्रपटाने लोकांची मने जिंकली होती. ‘बाहुबली: द बिगिनिंग २०१५’ मध्ये प्रदर्शित झाला. त्याचा दुसरा भाग ‘बाहुबली द कन्क्लुजन’ २०१७ मध्ये मोठ्या पडद्यावर आला. म्हणजेच ‘बाहुबली २’ रिलीज होऊन आता आठ वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने निर्मात्यांनी चित्रपटाच्या पुनर्प्रदर्शनाबाबत मोठी घोषणा केली आहे. पीरियड ॲक्शन ड्रामा फ्रँचायझी ‘बाहुबली’ने बॉक्स ऑफिस कलेक्शनचे नवे विक्रमही प्रस्थापित केले. ‘बाहुबली २’ अनेक वर्षांपासून सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट राहिला. पुढे २०२३ मध्ये शाहरुखच्या ‘पठाण’ने त्याचा कलेक्शन रेकॉर्ड मोडला. ओटीटीवर चित्रपटप्रेमींकडूनही या चित्रपटाचे कौतुक झाले. आता ‘बाहुबली भाग २’ ला आठ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने निर्मात्यांनी बाहुबलीच्या पुनर्प्रदर्शनाची घोषणा केली आहे. तेव्हा प्रभासचा चित्रपट बॉलिवूड चित्रपटांच्या पुन्हा प्रदर्शित होण्याच्या ट्रेंडला आव्हान देण्यासाठी मोठ्या पडद्यावर दाखल होणार आहे.



प्रभास अभिनीत ‘बाहुबली २’ २८ एप्रिल २०१७ रोजी प्रदर्शित झाला होता. २५० कोटींच्या बजेटमध्ये बनलेला या चित्रपटाने जगभरात १८०० कोटींहून अधिक कमाई केली आणि एसएस राजामौली दिग्दर्शित हा चित्रपट सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट बनला. बाहुबली निर्माते म्हणाले की, ‘या वर्षी आम्ही ‘बाहुबली’ पुन्हा प्रदर्शित करण्याचा विचार करत आहोत. ही माहिती तुम्हा सर्वांसोबत शेअर करताना मला आनंद होत आहे. हा चित्रपट पुन्हा एकदा भारतीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या पडद्यावर प्रदर्शित केला जाईल. अर्थातच हा प्रिय चाहत्यांसाठी आनंदोत्सवाचा एक उत्तम प्रसंग असेल. या निमित्ताने जुन्या आठवणी ताज्या करण्याची संधी मिळेल. नवीन खुलासे होतील.’

# चर्चा ‘महाभारत’ची

एसएस राजामौली ‘आरआरआर’ या ऑस्कर विजेत्या चित्रपटानंतर आता महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा यांच्यासवे ‘एसएसएमबी२९’ या बहुप्रतिक्षित प्रकल्पावर काम करत आहेत. त्याचे चित्रीकरण सुरू झाले असून हैदराबादमध्ये एका खास कार्यक्रमादरम्यान राजामौली यांनी ‘महाभारत’ बद्दलही एक मोठी अपडेट दिली आहे.



हैदराबादमध्ये नानी यांच्या ‘हिट ३’ चित्रपटाच्या प्री–रिलीज कार्यक्रमाला राजामौली उपस्थित होते. या दरम्यान, सूत्रसंचालक आणि अभिनेत्री सुमा कनकलाने त्यांना ‘महाभारता’तील कास्टिंगबद्दल प्रश्न विचारला. तिने विचारले की नानी देखील या भव्य प्रकल्पाचा भाग असेल का? यावर, राजामौलींनी हसत उत्तर दिले, ‘आतापर्यंत फक्त नानीचे कास्टिंग नक्की झाले आहे...’ त्यांच्या विधानानंतर उपस्थितांनी टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला.

राजामौली यांनी हे देखील स्पष्ट केले की ते प्रथम महेश बाबू अभिनीत ‘एसएसएमबी२९’ चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण करतील आणि नंतर ‘महाभारत’ वर पूर्णपणे लक्ष केंद्रित करतील. या चित्रपटाविषयी प्रेक्षकांमध्ये आधीच खूप उत्सुकता आहे. त्यात आता नानीचे नाव नक्की झाल्यानंतर चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे.

कार्यक्रमादरम्यान नानीने स्टेजवरून राजामौली यांचे आभार मानले. ते म्हणाले, मी त्यांना मेसेज करून आमंत्रित केले होते. ते त्यांच्या चित्रपटाच्या चित्रीकरणात व्यस्त होते, पण तरीही येण्यासाठी होकार दिला. त्यांचे येथे येणे माझ्यासाठी खूप खास आहे. ‘हिट ३’ मध्ये नानी आक्रमक पोलिस अधिकारी ‘अर्जुन सरकार’ ची भूमिका साकारत आहे. शैलेश कोलानू दिग्दर्शित या चित्रपटात नानीसोबत श्रीनिधी शेट्टी असून तो बघण्यासाठी प्रेक्षक आतुर आहेत. बॉस ऑफिसवर सूर्याच्या ‘रेट्रो’ शी त्याची टक्कर होईल. त्यात कोण बाजी मारतो ते लवकरच कळेल.

# रंजन आणि बोध

‘पंचायत’ सारख्या सुपरहिट वेब सिरीजनंतर आता आणखी एक रंजक कथा येणार आहे, ती म्हणजे ‘ग्राम चिकित्सालय’. ही पाच भागांची मालिका एका महत्त्वाकांक्षी शहरी डॉक्टरची कहाणी दाखवत असून तो एका दुर्गम गावातील जवळजवळ बंद पडलेले आरोग्य केंद्र पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करतो. या प्रवासात त्याला सरकारी कार्यालयांच्या अडचणी, गावकऱ्यांच्या शंका आणि लहान गावामधील अनोख्या समस्यांना सामोरे जावे लागते.



‘ग्राम चिकित्सालय’मध्ये अमोल पराशर आणि विनय पाठक मुख्य भूमिका साकारत आहेत. त्यांच्यासोबत आकांक्षा रंजन कपूर, आनंदेश्वर द्विवेदी, आकाश मखीजा आणि गरिमा विक्रांत सिंह यासारखे कलाकार देखील दिसतील. हे सर्व मिळून या गावाच्या कथेत जिवंतपणा आणणार आहेत.

ही मालिका ‘द व्हायरल फिव्हर’ (टीव्हीएफ) च्या बॅनरखाली बनवली गेली आहे. ‘पंचायत’ चे निर्माते असलेले दीपक कुमार मिश्रा यांनीच ती तयार केली आहे. कथा वैभव सुमन आणि श्रेया श्रीवास्तव यांची असून ती राहुल पांडे दिग्दर्शित आहेत. ‘ग्राम चिकित्सालय’ ९ मे रोजी प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. मात्र पोस्टच्या कमेंट सेक्शनमध्ये प्रेक्षकांनी आधीच प्रेमाचा वर्षाव करायला सुरुवात केली आहे.

प्राइम व्हिडिओ इंडियाचे कंटेंट डायरेक्टर मनीष मेंघानी म्हणाले, ‘आम्हाला फक्त मनोरंजन करायचे नाही तर भारताची विविधता जगासमोर आणायची आहे. ‘ग्राम चिकित्सालय’ हीच विचारधारा दाखवते. ही मालिका खेड्यातील एका आदर्शवादी डॉक्टरची कथा आहे, जो तुम्हाला हसवतोच पण त्याचवेळी अनेक महत्त्वपूर्ण मुद्द्यांना स्पर्श करतो. ‘द व्हायरल फिव्हर’चे अध्यक्ष विजय कोशी याबद्दल म्हणतात, ‘ग्राम चिकित्सालय’ डॉ. प्रभात यांचा प्रवास तसेच आदर्श आणि वास्तव यांच्यातील संघर्षाचे चित्रण करतो. ते केवळ रोगांशीच नव्हे तर व्यवस्था आणि लोकांच्या मानसिकतेशी देखील लढतात.’ थोडक्यात ‘ग्राम चिकित्सालय’ बघताना तुमचे मनोरंजन होईलच त्याचबरोबर ती तुम्हाला विचार करण्यासही भाग पाडेल.